RNI : MAHMAR/2022/88796

www.vidarbhkesari.com · Vidabh Kesari News · 90969 45629 · @vidarbhkesari

vidarbhkesari21@gmail.com

दैनिक **विदर्भ केसरी** विदर्भाचा मानबिंदू

मुख्य संपादक : अमोल कंटाळे

www.vidarbhkesari.com

अमरावती
२३ सोमवार मार्च २०२६
✻ वर्ष ५ ✻ अंक २९६
✻ पृष्ठ : ६ ✻ मूल्य रु : ३

## ई-केवायसीसाठी शेवटचे १० दिवस शिल्लक

**लाडकी बहीण योजनेच्या तिस-या टप्प्यातील पडताळणीसाठी आता केवळ शेवटचे १० दिवस शिल्लक आहेत. ३१ मार्चपर्यंत लाभार्थ्यांची अंतिम यादी निश्चित केली जाणार आहे. तर अपात्र महिलांची संख्याही वाढण्याची शक्यता आहे. आतापर्यंत ४५ लाखांपेक्षा जास्त महिलांना या योजनेतून वगळण्यात आले आहे. अटी आणि नियमांचे पालन न करणा-या लाडक्या बहिणींवर कडक कारवाई देखील करण्यात येत असल्याचे समोर आले आहे. ई-केवायसी अखेरच्या टप्प्यात आहे, पण जानेवारीनंतर लाडकीच्या खात्यात एकही हप्ता आलेला नाही. ३१ मार्च रोजी लाडकी बहीण योजनेसाठी ई-केवायसी करण्याची मुदत संपणार आहे.**

## उद्धव ठाकरेंसह 9 जणांचा विधानपरिषदेचा कार्यकाळ संपणार

**▸विदर्भ केसरी।**

महाराष्ट्र विधानपरिषदेतील राजकीय समीकरणे आता बदलण्याच्या उंबरठ्यावर आहेत. शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासह विधानपरिषदेच्या एकूण ९ सदस्यांचा कार्यकाळ येत्या १३ मे रोजी संपुष्टात येत आहे. या पार्श्वभूमीवर, उद्या या सर्व सदस्यांना सभागृहात अधिकृतपणे निरोप दिला जाणार आहे. हे सर्व सदस्य विधानसभा सदस्यांद्वारे निवडून दिले गेले होते. उद्या सभागृहात निरोप दिला जाणाऱ्या सदस्यांमध्ये सत्ताधारी आणि विरोधी अशा दोन्ही बाजूंच्या दिग्गज नेत्यांचा समावेश आहे. विशेषतः उद्धव ठाकरे यांच्या निरोपामुळे शिवसेना (यूबीटी) ची विधानपरिषदेतील उपस्थिती आणि मांडणीत बदल होणार आहे. तसेच विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांचाही कार्यकाळ संपत असल्याने, या रिक्त होणाऱ्या जागांवर आता कोणाची वर्णी लागणार, याबाबत राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

# पिवळे वादळ जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकले...

## ओबीसी आरक्षणासह जातीय जनगणनेची मागणी





### महिलांचा सहभाग

**विशेषतः महिला आघाडीच्या मंगला वाडीभस्मे, ललिता देशमुख, वृंदा गायधने आणि भावना निकुळे, जयश्री बोरकर यांच्या सक्रिय सहभागामुळे आंदोलनाला मोठी ताकद मिळाली. तसेच शुभदा झंझाळ, अनिता बोरकर, मनोज बोरकर आणि अरुण यांच्यासह हजारो नागरिकांनी रस्त्यावर उतरून आपला पाठिंबा दर्शविला.**

**▸विदर्भ केसरी। भंडारा :**

ओबीसी आरक्षणाच्या आणि जातनिहाय जनगणनेच्या मागणीसाठी रविवारी दिनांक २२ मार्च रोजी भंडाऱ्यात ओबीसी समाजाचा मोठा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकल. या आंदोलनात मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाल्यामुळे संपूर्ण परिसर पिवळ्या वादळाने (पिवळे झेंडे आणि पटके) न्हाऊन निघाला होता.

भंडारा शहरात ओबीसी समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी काढण्यात आलेला हा 'लाँग मार्च' अत्यंत भव्य आणि ऐतिहासिक ठरला. केंद्र आणि राज्य सरकारने तात्काळ ओबीसींची जातनिहाय जनगणना करावी, आगामी जनगणनेत ओबीसींसाठी स्वतंत्र रकाना असावा ही मुख्य मागणी करण्यात आली. हा मोर्चा शहरातील ऐतिहासिक दसरा मैदानावरून निघाला आणि शिस्तबद्ध पद्धतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. या आंदोलनात ओबीसी संघर्ष समितीचे पदाधिकारी, विविध संघटनांचे प्रतिनिधी आणि समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या आंदोलनाद्वारे ओबीसी समाजाने आपल्या हक्कासाठी एकजुटीचा संदेश दिला असून, प्रशासनाला मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले आहे.

भंडारा येथे ओबीसी जनगणनेच्या मागणीसाठी विविध राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनांनी एकत्र येत मोठा मोर्चा काढला होता. या मोर्चाला कोणत्याही एका पक्षापुरते मर्यादित न ठेवता सर्वच राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनांनी आपली शक्ती पणाला लावली. या मोर्चा महिला आणि युवकांची उपस्थिती अत्यंत लक्षणीय होती. सर्व आंदोलकांनी पिवळ्या टोप्या आणि दुपट्टे परिधान केले होते, ज्यामुळे संपूर्ण शहर पिवळ्या रंगात न्हाऊन निघाले होते. 'जय ओबीसी, जय संविधान' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

### केंद्र सरकार आश्वासन देऊन मागे हटले

**निवडणूकपूर्व काळात आश्वासन देऊनही, प्रत्यक्ष जनगणनेच्या प्रक्रियेत (गॅझेटमध्ये) ओबीसींसाठी स्वतंत्र रकाना देण्यात आलेला नाही. केंद्र सरकारने जनगणनेत ओबीसींचा स्वतंत्र विचार न केल्याबद्दल आंदोलकांनी तीव्र संताप व्यक्त केला. विरोधी पक्षनेत्यांनी केंद्र सरकारवर 'यू-टर्न' घेतल्याचा आरोप केला. पंतप्रधानांनी संसदेत आश्वासन देऊनही आता सरकार त्यापासून मागे हटत असल्याचा आरोप विजय वडेट्टीवार यांनी केला. खासदार डॉ. प्रशांत पडोळे, आमदार नाना पटोले, अभिजित वंजारी आणि चरण वाघमारे यांसारख्या बड्या नेत्यांनी भाषणातून सरकारवर कडक ताशेरे ओढले.**

### प्रमुख मागणी

**केंद्र सरकारने त्वरित ओबीसींची जातनिहाय जनगणना करावी, ही या 'वज्रमुठी'मागची प्रमुख मागणी आहे. सदानंद इलमे, प्रभाकर वैरागडे, रमेश शहारे, संजय मते आणि डॉ. बाळकृष्ण सार्वे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. या आंदोलनाच्या यशस्वीतेसाठी भगीरथ धोटे, उमेश कोर्राम, गोपाल सेलोकर आणि जयंत झोडे यांच्यासह अनेक प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.**

दैनिक **विदर्भ केसरी** विदर्भाचा मानबिंदू
मुख्य संपादक : अमोल कंटाळे

## !! पाहिजेत !!

**कार्यालय व्यवस्थापक** (Office Manager)
'दैनिक विदर्भ केसरी'च्या दर्यापूर येथील कार्यालयासाठी एक सक्षम, अनुभवी आणि तरुण कार्यालय व्यवस्थापक पाहिजे आहे.

**⏭ पात्रता आणि आवश्यकता:**

पत्रकारिता क्षेत्रातील ज्ञान तसेंच राजकीय पत्रकारिता आणि वृत्तपत्र कार्यालयाच्या कामाचा किमान २ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.
**उत्तम जनसंपर्क:** स्थानिक राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय वर्तुळात चांगला जनसंपर्क असणे महत्त्वाचे.
**संगणक ज्ञान:** आणि इंटरनेटचे प्राथमिक ज्ञान असणे आवश्यक स्वतःची दुचाकी असणे अनिवार्य आहे.

- **शिक्षण: कोणत्याही शाखेचा पदवीधर**
- **आकर्षक मानधन: पात्र उमेदवाराला योग्य आणि आकर्षक मानधन दिले जाईल.**
- **एक प्रतिष्ठित आणि वेगाने वाढणाऱ्या माध्यम समूहात काम करण्याची संधी.**

**इच्छुक उमेदवारांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा:**
**कार्यालय: आयेशा टॉवर, दर्यापूर, जि. अमरावती.**
**संपर्क: ९९७५५३२२९१/९०९६९४५६२९**

## कशासाठी मोर्चा काढतायत त्यांनाच माहिती नाही

**▸विदर्भ केसरी। नागपूर :**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) ही भाजपची मातृसंघटना आहे. आरएसएसच्या निर्देशानुसारच भाजप कार्य करीत असल्याची टीका अनेकदा झाली आहे. यापूर्वी बामसेफ आणि भारत मुक्ती मोर्चाच्या वतीने आरएसएस मुख्यालयावर मोर्चा काढण्यात आला. बामसेफच्या कार्यक्रमास आरएसएसच्या इशाऱ्यावरून परवानगी नाकारण्यात आल्याचा आरोप करीत नागपुरात संघ मुख्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता.

आता काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीकडून आरएसएसच्या मुख्यमालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे.एपस्टिन फाइलवरून ते मोर्चा काढणार आहे. एपस्टिन फाइलवर स्पष्टीकरण देत संबंधितांवर कारवाईचीही मागणी आहे. सोमवारला हा मोर्चा काढण्यात येणार आहे. यामुळे सुरक्षा यंत्रणा अलर्ट मोडवर आहेत. तर या मोर्चावर सत्ताधाऱ्यांचेही लक्ष लागले आहे.



### मुख्यमंत्री काय म्हणाले?

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही यावर भाष्य केले आहे. ते म्हणाले की, लोकशाहीत कुणालाही कुणाविरोधात मोर्चा काढण्याचा अधिकार आहे. परंतु ते कशासाठी मोर्चा काढत आहे, हे त्यांनाच माहीत नसल्याची टीका फडणवीस यांनी केली.


## ज्येष्ठ नेते माजी खासदार दत्ता मेघे यांचे निधन

### 89 व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास, विदर्भातील प्रभावी व दूरदृष्टीचे नेते म्हणून ओळख

**▸विदर्भ केसरी।**

विदर्भातील ज्येष्ठ नेते आणि माजी खासदार दत्ता राघोबाजी मेघे (वय ८९) यांचे रविवारी दिनांक २२ मार्च रोजी नागपूर येथील निवासस्थानी निधन झाले. त्यांच्या निधनाने विदर्भाच्या राजकीय व सामाजिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली असून सर्वत्र शोक व्यक्त केला जात आहे.

दत्ताजी मेघे हे विदर्भातील प्रभावी व दूरदृष्टीचे नेते म्हणून ओळखले जात होते. त्यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत लोकसभा खासदार म्हणून जनतेचे प्रतिनिधित्व केले. ग्रामीण भागाच्या विकासासाठी, विशेषतः शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधांसाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. सावंगी मेघे येथे भव्य रुग्णालयाची स्थापना केली. त्यांच्या कार्यकाळात विदर्भातील अनेक विकासकामांना गती मिळाली.




राजकारणाबरोबरच सामाजिक क्षेत्रातही त्यांचे मोठे योगदान होते. त्यांनी शिक्षण संस्थांची उभारणी करून ग्रामीण विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. त्यांच्या पुढाकारातून सुरू झालेल्या अनेक शैक्षणिक व वैद्यकीय संस्था आजही समाजसेवेचे कार्य करत आहेत. त्यामुळे ते केवळ राजकारणी नव्हे, तर समाजसेवक म्हणूनही जनमानसात लोकप्रिय होते.

दत्ता मेघे यांचा स्वभाव साधा, लोकाभिमुख आणि कार्यपद्धती पारदर्शक होती. सामान्य नागरिकांच्या समस्या समजून घेऊन त्यावर त्वरित उपाययोजना करण्यासाठी ते ओळखले जात. त्यामुळे त्यांना सर्वपक्षीय आदर लाभला होता.



**माजी खासदार दत्ता मेघे यांनी नववर्षाच्या स्वागतार्ह वर्ध्यातील सोशालिस्ट चौक येथे आयोजित पाडवा पहाट कार्यक्रमाला उपस्थिती दर्शविली होती आणि तीच उपस्थिती त्यांची शेवटची ठरली. तब्बल तीन तास त्यांनी संगीतमय कार्यक्रमाचा आस्वाद घेतला.**

त्यांच्या पश्चात कुटुंबीयांसह मोठा राजकीय व सामाजिक वारसा आहे. त्यांच्या निधनाने विदर्भाने एक अनुभवी, अभ्यासू आणि जनतेशी नाळ जुळलेला नेता गमावला आहे. त्यांच्या कार्याची प्रेरणा पुढील पिढ्यांना मार्गदर्शक ठरेल, अशा भावना विविध स्तरांतून व्यक्त होत आहेत.




## हर्षवर्धन सदगीर ठरला महाराष्ट्र केसरी

**▸विदर्भ केसरी।**

रामकृष्ण अण्णा सातव पाटील यांच्या आयोजनातून पार पडलेल्या ६८ व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचा समारोप सोहळा पुणे येथे मोठ्या दिमाखात संपन्न झाला. या सोहळ्यास विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लाभली, तसेच कुस्तीप्रेमींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या वर्षीच्या महाराष्ट्र केसरी किताबावर नाशिकच्या हर्षवर्धन सदगीरने दुसऱ्यांदा आपले नाव कोरले. अंतिम लढतीत त्याने सोलापूरच्या महेंद्र गायकवाडला पराभूत केले. महेंद्र गायकवाड या स्पर्धेत उपविजेता ठरला.

६८ व्या वरिष्ठ महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद व महाराष्ट्र केसरी किताब कुस्ती स्पर्धेत माती विभागात सोलापूर जिल्ह्याच्या महेंद्र गायकवाडने, तर गादी विभागात नाशिकच्या अनुभवी हर्षवर्धन सदगीरने अंतिम फेरीत प्रवेश केला होता. विशेष म्हणजे, हे दोन्ही मल्ल अर्जुन पुरस्कार विजेते काका पवार यांच्या तालमीत तयार झालेले असून एकाच आखाड्यात सराव करणारे आहेत.

माती विभागातील उपांत्य लढतीत सोलापूर जिल्ह्याच्या महेंद्र गायकवाडने हिंगोलीच्या सिकंदर शेखवर ३-० अशी मात करत अंतिम फेरी गाठली. ही लढत सुरुवातीपासूनच अटीतटीची आणि तुल्यबळ ठरली. बाहुबली अशी ओळख असलेल्या महेंद्रने आक्रमक खेळाची सुरुवात करत प्रतिस्पर्ध्यावर दबाव निर्माण केला.

गादी विभागातील उपांत्य फेरीत नाशिकच्या अनुभवी हर्षवर्धन सदगीरने जय पाटीलवर एकतर्फी वर्चस्व गाजवले. त्याने अवघ्या अडीच मिनिटांत तांत्रिक गुणांच्या आधारे जय पाटीलचा १०-० असा पराभव करत अंतिम फेरीत धडक मारली.



दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू
सोमवार, २३ मार्च २०२६ | २

# अग्रलेख

## राजीनामा

नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात याने अनेक महिलांचे लैंगिक शोषण केल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाल्यानंतर संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळली. या पार्श्वभूमीवर राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांचा खरातची पाद्यपूजा करतानाचा व्हीडीओ व्हायरल झाल्यानंतर चाकणकर यांच्यावर चोहोबाजूंनी टीकेची झोड उठली. विरोधकांनी त्यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली. अखेर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेतल्यानंतर रात्री उशिरा चाकणकरांनी राजीनामा दिला. वैयक्तिक कारणाने आपण राजीनामा देत आहोत असे त्यांनी म्हटले आहे. रुपाली चाकणकर यांनी नुकतीच पुणे 'डीजीं'ची भेट घेतली होती. तसेच सुनेत्रा पवार यांच्या भेटीसाठी जाण्यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची त्यांनी 'वर्षा' बंगल्यावर भेट घेतली होती. त्यानंतर रात्री उशिरा चाकणकर यांनी सुनेत्रा पवारांची भेट घेतली व या भेटीत त्यांनी आपला राजीनामा त्यांच्याकडे सुपुर्द केला. नाशिकमधील महिला अत्याचार प्रकरणातील आरोपी आणि तथाकथित भोंदू ज्योतिषी कॅप्टन अशोक खरात याच्याशी संबंधित प्रकरणामुळे अडचणीत आलेल्या राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांना अखेर आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागला. सुनेत्रा पवार यांनी हा राजीनामा स्वीकारला आहे. दरम्यान, आपण वैयक्तिक आणि स्वेच्छेने राजीनामा देत असल्याचे चाकणकर यांनी स्पष्ट केले आहे. रुपाली चाकणकर यांना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदावरून पायउतार व्हावे लागले आहे. संवैधानिक पदावर असताना राजीनामा द्यावा लागलेल्या रुपाली चाकणकर या राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या तिस-या नेत्या ठरल्या आहेत. या आधी धनंजय मुंडे आणि माणिकराव कोकाटे यांना त्यांच्यावर झालेल्या आरोपांमुळे मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. चाकणकर या नाशिक जिल्ह्यातील सिन्नर येथील श्री शिवनिका संस्थानच्या विश्वस्त सदस्य असून, त्या संस्थेचा कॅप्टन अशोक खरात हा अध्यक्ष आहे. महिलांचा लैंगिक छळ आणि बलात्काराच्या आरोपांवरून पोलिसांनी खरातला अटक केल्यानंतर मागील तीन दिवसांपासून चाकणकर चांगल्याच अडचणीत आल्या होत्या. एक वर्षापूर्वी भोंदूबाबा म्हणून खरात यांचा पर्दाफाश करणा-या स्थानिक पत्रकाराला धमकावून माफी मागायला लावल्याचा आरोपही त्यांच्यावर करण्यात आला आहे. याशिवाय चाकणकर यांचे भोंदू खरातसोबतचे विविध फोटो आणि व्हीडीओ समाज माध्यमावर व्हायरल झाले आहेत. त्यामुळे चाकणकरांच्या राजीनाम्यासाठी विरोधी पक्षांसह विविध स्तरांतून दबाव वाढत चालला होता.


त्यातच सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया तसेच शिवसेना (उबाठा) नेत्या सुषमा अंधारे यांनी पत्रकार परिषदा घेऊन चाकणकर यांच्यावर टीकेची झोड उठवली होती. राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी हे प्रकरण गांभीर्याने घेऊन चाकणकर यांच्यावर कारवाई करण्याचे संकेत दिले होते. रुपाली चाकणकर यांनी भोंदू खरात प्रकरणात आपली बाजू मांडण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची शुक्रवारी भेट घेतली होती. भेटीत फडणवीस यांनी चाकणकर यांना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार रात्री उशिरा चाकणकरांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची 'देवगिरी' या शासकीय निवासस्थानी भेट घेऊन त्यांच्याशी अर्धा तास चर्चा केली. मुख्यमंत्र्यांनी महिला आयोगाच्या अध्यक्षांना राजीनामा देण्याचे आदेश दिल्याबद्दल मुख्यमंत्र्यांचे आभार, परंतु केवळ राजीनामा घेऊन चालणार नाही, तर या प्रकरणाच्या तळाशी जाऊन पारदर्शक चौकशी करावी आणि आमदार अमोल मिटकरी म्हणतात त्याप्रमाणे अजितदादांच्या अपघाताशी या भोंदूबाबाचे कनेक्शन आहे का? याचाही तपास व्हायला हवा, असे ट्विट रोहित पवार यांनी केले आहे. भोंदूबाबा अशोक खरात याच्यावर महिलांवरील अत्याचाराचे गंभीर आरोप होत आहेत. या प्रकरणी मुख्यमंत्र्यांनी कारवाईचे आदेश दिल्यानंतर राजकीय वर्तुळात खळबळ माजली.

अनेक राजकीय व्यक्तींचा त्याच्याशी संपर्क असल्याचे पुरावे उघड झाल्याने सत्ताधा-यांचे धाबे दणाणले आहे. राज्यात अंधश्रद्धा निर्मूलन कायदा लागू करण्यात आला असूनही याला अनेकजण बळी पडत आहेत. आता तर याचा संबंध अजित पवारांच्या मृत्यूशी जोडला जात असल्याने यात मोठाच ट्विस्ट आला आहे. अलिकडेच अमेरिकन न्यायालयात एपस्टीन फाईलमधील संशयितांची नावे उजेडात आल्याने जगभरात खळबळ माजली. काहीसा असाच प्रकार खरात बाबाच्याही संदर्भात दिसून येतो. त्याच्या १०० क्लिप्स सापडल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे आता पीडित महिला पुढे आल्यास त्याच्याविरुद्ध भक्कम पुरावे मिळतील आणि त्यामुळे खरातभोवती घट्ट फास आवळला जाईल. परंतु राजकीय हस्तक्षेप करून हे प्रकरण दाबण्यात आल्यास त्यातून काहीच निष्पन्न होणार नाही. भोंदूबाबा खरातकडे अनेक बडे राजकीय नेते, सेलिब्रिटी, उद्योजक मार्गदर्शन घेण्यासाठी जात होते म्हणे. म्हणजे खरातला मोठे करण्यात ही मंडळीही तितकीच जबाबदार आहे. या मंडळींमुळे इतरांचाही खरातवर विश्वास बसला. खरातने राजकारण्यांशी असलेल्या संबंधांचा फायदा घेत महिलांवर अत्याचार केले. खरात हा समाजात 'साधू' म्हणून वावरत होता. महिला आयोगाच्या अध्यक्षाच जर भोंदू बाबाचे पाय धुताना दिसत असतील तर महिलांनी कोणाकडून न्यायाची अपेक्षा ठेवावी? खरात दैवी शक्तीचा दावा करून, संमोहन आणि अघोरी विधींच्या नावाखाली महिलांचे लैंगिक शोषण करत होता. त्याने संख्याशास्त्राच्या जोरावर लोकांचा विश्वास संपादन केला होता. तो महिलांना सांगायचा म्हणे की, अपत्यप्राप्तीसाठी किंवा घरातील समस्या निवारण्यासाठी 'योनीपूजा' करणे अनिवार्य आहे. याच विधीच्या नावाखाली तो महिलांवर अत्याचार करायचा. काहींना तर त्याने पतीच्या जीवाला धोका असल्याचे सांगून घाबरवले आणि त्यांचे शोषण केले. अनेकदा तो महिलांशी बनावट लग्न लावून त्यांना आपल्या जाळ्यात ओढत असे. गत १५ वर्षांत त्याने सुमारे २०० कोटींहून अधिकची माया जमवल्याचे सांगण्यात येते. त्याने स्वतःच्या पत्नी आणि मुलीच्या नावेही कोट्यवधींच्या जमिनी घेतल्या आहेत म्हणे. सध्या पोलिस त्याच्या आर्थिक व्यवहाराची आणि त्याच्याशी संबंधित इतर बड्या व्यक्तींची चौकशी करत आहेत. त्याच्या संपर्कात असलेल्या सर्व मंत्र्यांचे आणि त्यांच्या निकटवर्तीयांचे कॉल डिटेल रेकॉर्डस् (सीडीआर) तपासले जावेत. अफाट संपत्ती जमवणा-या खरातला मिळणारा राजाश्रय पाहता काही विशिष्ट लोकांना वाचवण्याचा प्रयत्न होऊ शकतो. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे.

# राज्यातील हॉटेल, उपहारगृह चालकांना दिलासा

## व्यावसायिक गॅस पुरवठ्यात 20% वाढ, नागरी व पुरवठा मंत्री छगन भुजबळांची माहिती

▸विदर्भ केसरी।



इराण विरुद्ध अमेरिका - इस्त्रायल युद्धामुळे अडचणीत सापडलेल्या राज्यातील हॉटेल, ढाबे व उपहारगृह चालकांसाठी एक आनंदाची बातमी आहे. केंद्र सरकारच्या निर्देशांनुसार व्यावसायिक गॅसचा पुरवठ्यात 20 टक्क्यांची वाढ करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी रविवारी दिली. यामुळे छोट्या व्यावसायिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

आखाती देशांत सुरू असलेल्या युद्धामुळे सरकारने व्यावसायिक गॅसच्या पुरवठ्यावर निर्बंध घातले होते. केंद्रीय पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाने 21 मार्च रोजी जारी केलेल्या सूचनेनुसार यापूर्वी राज्याला केवळ 30 टक्के एलपीजी वाटप मंजूर होते. आता 23 मार्चपासून पुढील आदेश येईपर्यंत अतिरिक्त 20 टक्के वाटप वाढवण्यात आले आहे. त्यामुळे राज्यातील एकूण गॅस पुरवठा हा संकटपूर्व पातळीच्या 50 टक्क्यांपर्यंत पोहोचणार आहे. या वाढीव 20 टक्के गॅस पुरवठ्यात हॉटेल्स, ढाबे, उपहारगृहे, औद्योगिक कॅन्टिन, अन्न प्रक्रिया उद्योग व दुग्ध व्यवसायाला प्राधान्य देण्यात येणार आहे.

याशिवाय राज्य शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांकडून चालवण्यात येणाऱ्या अनुदानित कॅन्टिन, कम्युनिटी किचन्स तसेच स्थलांतरित मजुरांसाठी राबवण्यात येणाऱ्या योजनांनाही या निर्णयाचा लाभ मिळणार आहे. 'प्रस्तुत निर्णयामुळे व्यावसायिक एलपीजीच्या तुटवड्यामुळे अडचणीत आलेल्या हॉटेल व अन्नपदार्थ व्यावसायिकांना मोठा दिलासा मिळेल. पण गॅस मिळवण्यासाठी त्यांना तेल विपणन कंपन्यांकडे नोंदणी करणे व पीएनजी जोडणीसाठी अर्ज करणे आवश्यक असणार आहे', असे छगन भुजबळ यांनी सांगितले आहे.

### केरोसिन वितरणाप्रकरणी महत्त्वाचे निर्णय

- **दुसरीकडे, सरकारने राज्यातील केरोसिन वितरणासंबंधीही काही महत्त्वाचे निर्णय घेतलेत. त्यानुसार, प्रलंबित परवाने आपोआप नुतनीकरण झाल्याचे मानण्यात येणार आहे. त्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. याशिवाय परवाने वारसांच्या नावाने तत्काळ वर्ग करण्याचे निर्देशही देण्यात आलेत. ज्या गावांमध्ये किरकोळ केरोसिन परवानाधारक उपलब्ध नाहीत, त्या ठिकाणी रास्तभाव दुकान चालवणाऱ्या दुकानदारांना किरकोळ केरोसिन परवानाधारक म्हणून मान्यता देऊन परवाना देण्याचे निर्देश देण्यात आलेत.**
- **सरकारने 20 मार्च रोजी जारी करण्यात आलेल्या शासनपत्रातही या संदर्भातील कार्यवाही करण्यासाठी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. या सर्व निर्णयामुळे राज्यातील इंधन पुरवठ्याला अधिक गती मिळण्याची शक्यता आहे.**

# हा तोच महाराष्ट्र आहे का?

## अशोक खरात प्रकरणावरून अंबादास दानवेंनी व्यक्त केल्या भावना

▸विदर्भ केसरी।



नाशिकचा भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाने महाराष्ट्रात खळबळ उडाली आहे. अनेक महिलांवर लैंगिक अत्याचार या खरातने केले असल्याचे समोर आले आहे. तसेच रुपाली चाकणकर यांचे अनेक फोटो व्हिडिओ अशोक खरातसोबत असल्याचे दिसून आल्यानंतर त्यांना राज्याच्या महिला आयोगाच्या अध्यक्षा पदावरून पायउतार व्हावे लागले आहे. या भोंदुगिरीच्या प्रकरणांवर शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून आपले विचार मांडले आहेत.

अंबादास दानवे यांनी ट्विट करत महाराष्ट्रातील राजकीय नेतृत्व तसेच समाजधुरिण यांना उद्देशून म्हटले की, महाराष्ट्र हे देशातील एक अत्यंत पुरोगामी, विचारी आणि स्वाभिमानी प्रवृत्ती जपणारे राज्य आहे. स्वातंत्र्योत्तर काळात आदरणीय यशवंतराव चव्हाण यांच्यापासून ते हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्यासारख्या उत्तुंग नेतृत्वाने या मातीला विचारांचे खतपाणी घातले. या महान नेत्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात आणि समाजकारणात कधीही अंधभक्तीला, बुवाबाजीला किंवा ढोंगीपणाला थारा दिला नाही. उलट, त्यांनी सामान्यांमध्ये तार्किक विचार आणि प्रखर वैज्ञानिक दृष्टिकोनाची पेरणी केली.

### एकनाथ शिंदेंवर अप्रत्यक्ष प्रहार

- **पुढे अंबादास दानवे म्हणाले, आज मात्र राज्याची सद्यस्थिती आणि विशेषतः नाशिकमधील कॅप्टन अशोक खरात यांसारखी प्रकरणे पाहिल्यावर मनात दाटून येणारा प्रश्न हाच आहे की, हा खरोखर तोच महाराष्ट्र आहे का? जिथे हिंदुहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेबांसारखा अंधश्रद्धा मुळापासून उपटून टाकणारा आणि थोतांडावर आसूड ओढणारा क्रांतीकारी नेता जन्माला आला, त्याच नेत्याचे भक्त म्हणवणारे आज सत्ता आणि स्वार्थासाठी खरात सारख्या भोंदू प्रवृत्तींची संगत आवडीने पसंत करत आहेत? ज्या प्रवृत्तींवर शिवसेनाप्रमुखांनी आयुष्यभर प्रहार केले, आज त्याच प्रवृत्तींच्या मांडीला मांडी लावून माननीय बाळासाहेबांचा वारसा सांगणारे बसलेले पाहून मनात या ढोंगीपणाची चीड उत्पन्न होते, असे म्हणत त्यांनी एकनाथ शिंदे यांच्यावर प्रहार केला आहे.**



# खरात प्रकरणाची चौकशी करा

## यवतमाळात महिलांचे थाळीनाद आंदोलन

▸विदर्भ केसरी। यवतमाळ

जेफ्री एप्स्टीनसारख्या जागतिक स्तरावर चर्चेत राहिलेल्या प्रकरणांनंतर अनेक देशांमध्ये प्रभावशाली व्यक्तींवर चौकशी होऊन अटक झाली होती.त्याच धर्तीवर महाराष्ट्रातही खरात प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित सर्व आरोपींवर कारवाई करावी,अशी मागणी करत शेतकरी चळवळीच्या महिलांनी आज यवतमाळ शहरातील नागरी वस्त्यांमध्ये थाळीनाद आंदोलन करून जनजागृती केली. स्थानिक आदिवासी सोसायटी परिसरात झालेल्या या आंदोलनात महिलांनी घोषणाबाजी करत माजी राज्य महिला आयोग अध्यक्षा रूपाली चाकणकर यांना खरात प्रकरणात सहआरोपी म्हणून अटक करण्याची मागणी केली. आंदोलनकर्त्यांनी "अटक करा... अटक करा... चाकणकर बाईंना अटक करा..." अशा घोषणा देत संताप व्यक्त केला. आंदोलनकर्त्यांच्या मते,जगभरात Jeffrey Epstein प्रकरण उघड झाल्यानंतर अनेक प्रभावशाली व्यक्तींवर चौकशी झाली,काहींना राजीनामे द्यावे लागले आणि अनेकांना अटकही करण्यात आली.त्यामुळे महाराष्ट्रातही जर अशा प्रकारचे गंभीर आरोप समोर येत असतील,तर त्यांची निष्पक्ष चौकशी होऊन दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे,अशी भूमिका महिलांनी मांडली. दरम्यान,सामाजिक माध्यमांवर कॅप्टन खरात यांच्यासोबत महाराष्ट्रातील काही राजकीय नेत्यांचे फोटो व्हायरल होत असल्याचा मुद्दाही आंदोलनकर्त्यांनी उपस्थित केला. या सर्व बाबींची निष्पक्ष व कसून चौकशी करून संबंधितांची जबाबदारी निश्चित करावी,अशी मागणीही महिलांनी केली. या थाळीनाद आंदोलनाद्वारे महिलांनी नागरी वस्त्यांमध्ये जाऊन नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. समाजातील महिलांच्या सुरक्षिततेसंबंधी प्रश्नांवर सरकारने गांभीर्याने लक्ष देऊन पारदर्शक चौकशी करावी,अशी मागणीही आंदोलनातून करण्यात आली. यावेळी शेतकरी चळवळीतील विद्या परचाके,लता हुमने,कल्पना कुळसंगे,छाया मडावी,संगीता मडावी,मीना केळकर,जया मडावी,अनिता सलाम,रेखा उईके,विना कुडमेथे,साविता तोडसाम,उज्वला सलामे,यांच्यासह अनेक महिला कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू

संपूर्ण विदर्भात प्रतिनिधी पाहिजेत !


विदर्भातील निर्भीड, निष्पक्ष आणि जनतेच्या प्रश्नांवर थेट आवाज उठवणारे अग्रगण्य दैनिकदैनिक विदर्भ केसरी साठी

प्रत्येक जिल्हा, तालुका व प्रमुख शहरांमध्ये
वार्ताहर / प्रतिनिधी / ब्युरो चीफ / उपसंपादक
जाहिरात प्रतिनिधी तात्काळ पाहिजेत.

- पत्रकारितेची आवड असलेले
- सामाजिक व राजकीय घडामोडींची जाण असलेले
- स्वतःचे दुचाकी वाहन व मोबाईल असलेले
- अनुभवी तसेच नवोदित इच्छुकांना संधी

आपल्यात लेखनकौशल्य, धाडस आणि समाजासाठी काम करण्याची जिद्द असेल तर ही सुवर्णसंधी आहे!

इच्छुकांनी आपला बायोडाटा व फोटो खालील नंबरवर पाठवावा.
(WhatsApp वर अर्ज स्वीकारले जातील)



संपर्क
संपर्क: 9975532291/9096945629
Gamil. vidarbhkesari@gmail.com
Web- www.vidarbhakesari.com

दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l, Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू

सोमवार, २३ मार्च २०२६ | ३

GOOD MORNING कॉटनसिटी

!! मना-मनात दारा-दारात फक्त विदर्भ केसरी!!

## घरफोडी व पानठेल्यातून सव्वा लाखाची चोरी

दिग्रस: अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून मोठ्या ऐवजावर डल्ला मारला आहे. फिर्यादी सुरेश राठोड हे घरी नसताना चोरट्यांनी दरवाजाचे कुलूप तोडून कपाटातील ५ ग्रॅम सोन्याचे पान, ३ ग्रॅम सोन्याची अंगठी आणि रोख १२,००० रुपये चोरले. याच रात्री चोरट्यांनी गावातील महादेव ढोके आणि साहेबराव हगवणे यांचे पानठेले फोडून रोख रक्कम व शीतपेयांच्या बाटल्या चोरून नेल्या. एकूण १,०४,९६० रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेल्याची तक्रार दिग्रस पोलिसात दाखल करण्यात आली आहे.

महत्त्वाचे



## उत्साहात साजरी झाली रमजान ईद; सर्वत्र बंधुभाव आणि आनंदाचे वातावरण

**विदर्भ केसरी। ढाणकी प्रतिनिधी, मिलिंद चिकाटे**

पवित्र रमजान महिन्याच्या सांगतेनंतर आज ढानकी शहरात 'ईद-उल-फितर' म्हणजेच रमजान ईद मोठ्या उत्साहात आणि आनंदाने साजरी करण्यात आली. महिनाभराच्या कडक उपवासानंतर (रोझा), आज मुस्लिम बांधवांनी एकत्र येत ईदगावर नमाज अदा केली आणि एकमेकांना गळाभेट घेत ईदच्या शुभेच्छा दिल्या व अल्लाह ताआला शी यावेळी देशात शांतता, समृद्धी आणि प्रगतीसाठी दुवा मागण्यात आली. ईदच्या पार्श्वभूमीवर कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलीस प्रशासनाकडून शहरात चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी काही मार्गांवर बदलही करण्यात आले होते. राजकीय नेत्यांनी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या आहेत. "हा सण केवळ आनंदाचा नसून तो संयम, दानशूरपणा आणि एकमेकांबद्दल आदर व्यक्त करण्याचा दिवस आहे," अशा भावना एका भाविकाने व्यक्त केल्या. थोडक्यात सांगायचे तर, रमजान हा केवळ उपाशी राहण्याचा नाही, तर शरीर, मन आणि आत्म्याला शुद्ध करण्याचा महिना आहे.



## आनंदी बालपण उपक्रमातून चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य

**विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**

बेलोरा ता. पुसद, जि. यवतमाळ येथे "आनंदी बालपण उपक्रम" उत्साहात पार पडला. या उपक्रमांतर्गत लहान मुलांना कपडे, स्टोरी पुस्तके, खेळणी, बोर्ड गेम आदी विविध साहित्याचे वाटप करण्यात आले. सदर साहित्य द किडव्हर्स टाटा फाउंडेशन, मुंबई यांच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आले होते. हे साहित्य स्व. मधुकरराव भगत शहरी व ग्रामीण विकास बहुउद्देशीय संस्था यांच्या वतीने लाभार्थी मुलांना वितरित करण्यात आले. या उपक्रमामुळे लहान मुलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला असून, उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक केले. सामाजिक बांधिलकी जपत अशा उपक्रमांमुळे गरजू मुलांना मदत मिळत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. या वेळी संस्थेचे अध्यक्ष राजकुमार भगत, उपाध्यक्ष शरद खंदारे, प्रशांत भगत, परमेश्वर भगत, तसेच संस्थेचे पदाधिकारी व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## रुग्ण व पोलीसांसोबत केली ईद साजरी

**विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**

इंजी.सैय्यद अन्वर अली यांनी दर वर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा रमजान ईद च्या दिवशी सकाळीच सह परिवार ग्रामिण रुग्णालय पुसद येथे रुग्ण व त्याच्या नातेवाईकांना शिरखुरमा वाटप करुन ईदच्या शुभेच्छा दिले. मागिल ४ वर्षा पासुन त्यांनी हा अनोखा उपक्रम सुरु ठेवला. सामाजिक कार्य करत असतांना आपल्या घरची मंडळ सोबत घेवुन मुस्लिम समाजातील एकमेव व्यक्तीमतव आहै .तसेच ईद घ्या दिवशी पोलिस बांधव आपले कर्तव्य बजावत दिवसभर चौकात उभे असतात.त्यांना पण चौकात चौकात जाऊन जागेवर शिरखुरमा देवुन ईद घ्या शुभेच्छा देण्यात आले..या वेळेस पत्नी ,मुलगा उमर अली, पुतन्या अशहर अली, पुतनी हाना व इतर मित्रमंडळी उपस्थित होते.. जवळपास ४०० लोकांना शुभेचछा दिले.

## भरधाव कारच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

यवतमाळ : लोहारा पोलीस स्टेशन अंतर्गत एका भीषण अपघाताची नोंद करण्यात आली आहे. दि. २० मार्च २०२६ रोजी रात्री ११ वाजेच्या सुमारास आकाश दुलसिंग जाधव (२७) हा तरुण आपल्या दुचाकीने यवतमाळवरून गावाकडे जात होता. जिल्हा परिषद शाळेसमोर आरोपी गुणवंत गणपत पाने (३५) याने आपली चारचाकी भरधाव वेगाने चालवून आकाशच्या दुचाकीला जोराची धडक दिली.

# श्वानाचा हैदोस : नऊ जणांना चावा

## नगरपरिषद निष्क्रिय : यवतमाळ शहरातील घटना, कुत्रे पकडण्याचा परवानाच नाही

**विदर्भ केसरी। यवतमाळ**

शहरातील माईंदे चौक परिसरात पिसाळलेल्या कुत्र्याने अक्षरशः दहशत माजवली असून काल रात्री महिला बँकेच्या मागील बाजूस असलेल्या अपार्टमेंट परिसरात तब्बल नऊ नागरिकांना चावा घेतल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. नगरपरिषद कारवाई करण्यास तयार नसल्याने शिवसेनेचे शहर उपाध्यक्ष संजय उपगनलावार यांनी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

या भागात आधीपासूनच भटक्या कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणात वावर असून, आता पिसाळलेल्या कुत्र्यामुळे परिस्थिती आणखी गंभीर झाली आहे. घटना समजताच शिवसेनेचे शहर उपाध्यक्ष संजय उपगनलावार यांनी तत्काळ



घटनास्थळी धाव घेऊन नागरिकांशी चर्चा केली. त्यांनी यवतमाळ नगर परिषदेच्या आरोग्य विभागाशी संपर्क साधला असता, "कुत्रे पकडण्याचा परवाना नसल्यामुळे आम्ही कारवाई करू शकत नाही," असे सांगत प्रशासनाने हात वर केल्याने नागरिकांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे. दरम्यान, ज्या नागरिकांना कुत्र्याने चावा घेतला, त्यांना वैद्यकीय महाविद्यालयात जाऊन उपचार घ्यावे लागले. संबंधित नागरिकांनी उपचाराचे कागदपत्र दाखवत प्रशासनाकडे तातडीने कुत्र्याचा बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने नागरिक हतबल झाले आहेत.

माईंदे चौक परिसरात कुत्र्यांची टोळकी रस्त्यावरच बसून वाहने पाहताच त्यांच्या अंगावर धावून जात असल्याने अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. अनेक वाहनचालक जखमी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. संकट मोचन रोड समर्थवाडी, शिवाजीनगर, गिलानी नगर, दहिवलकर प्लॉट यासह शहरातील विविध भागात मोठ्या प्रमाणात कुत्र्यांचा त्रास वाढला असून याविरोधात लवकरच तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा संजय उपगनलावार यांनी दिला आहे.

### काठ्या-दगड घेऊन नागरिकांचे स्वरक्षण

■ **नगरपरिषदेची कोणतीही मदत न मिळाल्याने माईंदे चौक परिसरातील नागरिकांनी स्वतःचे संरक्षण करण्यासाठी हातात काठ्या व दगड घेण्यास सुरुवात केली आहे. पिसाळलेल्या कुत्र्यामुळे जीविताला धोका निर्माण झाल्याने नागरिक भयभीत झाले असून, ते हातात काठ्या तसेच दगड घेऊन घराबाहेर पडत आहे. प्रशासनाने तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.**



## गहू जळून खाक

**विदर्भ केसरी। दारव्हा :**

लोही येथील शेतकरी सय्यद अकबर सय्यद रसूल यांच्या शेतातील गहू पिकाला भीषण आग लागून मोठे नुकसान झाले. ही घटना सांगलवाडी शिवारातील गट क्रमांक १७४ मध्ये रविवारी (दि. २२) दुपारी ३ वाजता घडली. संबंधित शेतकऱ्याने यावर्षी तीन एकर क्षेत्रात गहू पिकाची लागवड केली होती. शनिवारी ईद सणामुळे गहू काढणी पुढे ढकलण्यात आली होती. मात्र, काढणीपूर्वीच अचानक लागलेल्या आगीत अर्ध्यापेक्षा अधिक गहू पीक जळून खाक झाले. आग लागल्याची माहिती मिळताच शेतकऱ्याच्या मुलाने तसेच त्यांच्या सहकाऱ्यांनी आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. मात्र आग अत्यंत वेगाने पसरल्याने ती नियंत्रणात आणणे कठीण झाले आणि मोठे नुकसान झाले. हाताशी आलेले पीक अशा प्रकारे जळून गेल्याने शेतकऱ्यावर मोठे आर्थिक संकट ओढवले आहे. घटनेबाबत बातमी लिहिण्यापर्यंत कोणतीही अधिकृत तक्रार नोंदविण्यात आलेली नव्हती. तसेच महसूल, वन विभाग किंवा पोलीस यंत्रणेची तत्काळ कारवाई सुरू झाल्याची माहिती उपलब्ध नाही. दरम्यान, संबंधित शेतकऱ्याला तात्काळ मदत व नुकसानभरपाई देण्याची मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

## मडकोणा येथील प्रज्वल गोठे यांचा सन्मान

**विदर्भ केसरी। यवतमाळ**

ग्रामीण भागातील शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी उत्साह निर्माण व्हावा या उद्देशाने राष्ट्रीय क्रांतिकारी विचार महासंघ व मददगार फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने यवतमाळ तालुक्यातील मडकोना येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ शाळा व्यवस्थापण समिती अध्यक्ष सौ निताताई हारगुडे यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख पाहुणे राष्ट्रीय क्रांतिकारी विचार महासंघाचे मुख्यसंयोजक रुस्तम शेख यांच्या उपस्थित आयोजित करण्यात आला. या प्रसंगी मडकोणा येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा मडकोना केंद्र भारी पंचायत समिती यवतमाळ अर्तगत वर्ग ५ मध्ये शिकत असलेला प्रज्वल दिनेश गोठे हा विद्यार्थी जिल्हास्तरावर महादिप परीक्षेत उत्तीर्ण होऊन विमानवारी साठी




पात्र ठरल्या बद्दल राष्ट्रीय क्रांतिकारी विचार महासंघाचे मुख्य संयोजक रुस्तम शेख यांच्या हस्ते प्रज्वल गोठे यांचा पुष्पगुच्छ, ट्रॉफी व अग्निपंख पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला . या कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक श्रीमती ज्योती पिंजरकर , ( विद्यार्थ्याचे पालक ) श्री दिनेशभाऊ गोठे (स्थापित्य अभियांत्रीक सहाय्यक जिल्हा परिषद बांधकाम उप विभाग कळंब ) वर्ग शिक्षिका मरसकोल्हे मॅडम , श्रीमती शिरभाते मॅडम , श्री तामगाडगे सर, श्रीमती मंगाम मॅडम , श्रीमती नैना भोयर इ. मान्यवर व शिक्षक वृंद उपस्थित होते. भविष्यात कोणताही विद्यार्थी आर्थिक परिस्थिती मुळे शिक्षणा पासून वंचित राहू नये या उद्देशाने मददगार फाऊंडेशनच्या माध्यमातून गरीब, होतकरू ,हुशार विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करण्यात येईल अशी माहिती राष्ट्रीय क्रांतिकारी विचार महासंघाचे मुख्य संयोजक रुस्तम शेख यांनी दिली .

## फर्मेंटेट ऑरगॅनिक मॅन्युअर व लिक्विड फर्मेंटेट ऑरगॅनिक मॅन्युअर प्रशिक्षण उत्साहात

**विदर्भ केसरी। राजहंस शेंडे,**

कुही प्रतिनिधी - कुही तालुक्यातील किन्ही येथे फर्मेंटेट ऑरगॅनिक मॅन्युअर तथा लिक्विड फर्मेंटेट ऑरगॅनिक मॅन्युअर या विषयावर एक दिवसीय मार्गदर्शन व प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. हा कार्यक्रम भारत सरकारच्या कृषी एवं किसान कल्याण मंत्रालयांतर्गत क्षेत्रीय जैविक व नैसर्गिक शेती केंद्र, नागपूर यांच्या सौजन्याने तसेच कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत दीपस्तंभ ऑरगॅनिक फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेडच्या स्वनिर्मित जैविक निविष्ठा संसाधन केंद्र, किन्ही येथे आयोजित करण्यात आला.



या कार्यक्रमाला प्रादेशिक सेंद्रिय शेती केंद्र, नागपूर येथील क्षेत्रीय संचालक डॉ. अजय सिंह राजपूत, ज्युनिअर सायंटिस्ट डॉ. स्वप्नील प्रदीप मगर, टेक्निकल असिस्टंट श्री सुशील तलमले, दीपस्तंभ ऑरगॅनिक फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेडचे संचालक व प्रगतशील सेंद्रिय शेतकरी श्री चिंधू आत्माराम ठवकर, ब्लॉक तंत्रज्ञान व्यवस्थापन आत्मा कुहीचे श्री सचिन ताकसांडे तसेच सेंद्रिय शेती तज्ञ श्री खुशाल विष्णूजी ठवकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी तज्ज्ञांनी शेतकऱ्यांना फर्मेंटेट ऑरगॅनिक मॅन्युअर व लिक्विड फर्मेंटेट ऑरगॅनिक मॅन्युअर तयार करण्याची पद्धत, त्याचे शेतीतील फायदे तसेच नैसर्गिक शेतीला चालना देण्यासाठी त्याचा प्रभावी वापर कसा करावा याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणाला परिसरातील शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

## श्रीराम मंदिर शताब्दी महोत्सवात आमदार प्रवीण तायडेंकडून विधिवत पूजा-अर्चना व दर्शन



**विदर्भ केसरी। शिरसगाव कसबा प्रतिनिधी**

अक्षय गुर्जर:- येथील श्रीराम मंदिराला १०० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने शताब्दी महोत्सव व मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दि.१९ मार्चपासून सुरू झालेल्या या सोहळ्यात विविध धार्मिक कार्यक्रमांसहित नगरप्रदक्षिणा व भव्य शोभायात्रा पार पडली. सजवलेल्या रथात प्रभू श्रीराम, लक्ष्मण व सीता माता यांच्या मूर्तींची मिरवणूक गावातील प्रमुख मार्गावरून काढण्यात आली. या रथयात्रेत शेगाव येथील प्रसिद्ध दिंडी,विविध भजने व टाळ-मृदुंगाच्या गजरात शोभायात्रा पार पडली.तसेच अचलपूर मतदारसंघाचे आमदार प्रवीण तायडे यांनी दि.२१ फेब्रुवारी ला मंदिराला भेट देऊन प्रभू श्रीरामाचे दर्शन घेत पूजा-अर्चना केली.सोबतच प्रमोद कोरडे,साहेबराव अस्वार,भाजपा पदाधिकारी हे सुद्धा उपस्थित होते. या धार्मिक सोहळ्यात गावातील भाविक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी होत असून आयोजक समितीने सर्वांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# अकोला-वाशिम जिल्हा बँकेच्या निवडणुकीत 'हायव्होल्टेज' लढत

### झनक कुटुंबाच्या वर्चस्वाला डॉ. पाचरणे यांचे आव्हान

**विदर्भ केसरी। रिसोड प्रतिनिधी- प्रदिप खंडारे**

गेल्या अनेक वर्षांपासून बिनविरोध होणाऱ्या अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीने यंदा खऱ्या अर्थाने राजकीय वळण घेतले आहे.रिसोड येथील ३०/१ अ, प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा/ विकास सेवा सहकारी संस्था मतदार संघाच्या निवडणुकीत विद्यमान आमदार अमित झनक यांच्या मातोश्री शोभाताई झनक आणि कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती गजानन पाचरणे यांचे सुपुत्र डॉ.विठ्ठल पाचरणे यांच्यात थेट लढत होत असल्याने जिल्ह्याचे राजकीय वातावरण तापले आहे.गेली अनेक दशके या बँकेवर झनक कुटुंबाचे निर्विवाद वर्चस्व राहिले आहे, परंतु यंदा पहिल्यांदाच हे वर्चस्व




निवडणुकीच्या मैदानात कसोटीला लागले आहे. जिल्हा बँकेच्या या मतदार संघाची निवडणूक गेल्या दहा वर्षांपासून बिनविरोध होत होती. विशेष म्हणजे, बाजार समितीचे माजी सभापती गजानन पाचरणे हे दरवेळी आपला उमेदवारी अर्ज दाखल करत,परंतु ऐनवेळी काही कारणास्तव ते अर्ज मागे घेत असत.मात्र,यंदाची निवडणूक परिस्थिती पूर्णपणे वेगळी आहे. गजानन पाचरणे यांनी यावेळी माघार न घेता आपले सुपुत्र डॉ.विठ्ठल पाचरणे यांना रिंगणात उतरवले आहे. दुसरीकडे,झनक गटाने शोभाताई झनक यांच्या माध्यमातून आपली पकड कायम ठेवण्यासाठी कंबर कसली आहे.या एका जागेच्या निवडणुकीसाठी दोन्ही बाजूंकडून सर्वस्व पणाला लावले जात असल्याने रिसोडसह संपूर्ण जिल्ह्यात ही निवडणूक चर्चेचा विषय ठरली आहे.

### ७४ मतदारांच्या हाती सत्तेची चावी

■ **या निवडणुकीसाठी एकूण ७४ मतदार आपले मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदारांची संख्या कमी असली,तरी या निवडणुकीचे राजकीय महत्त्व अनन्य साधारण आहे.२९ मार्च रोजी रिसोड येथे मतदानाची प्रक्रिया पार पडणार असून,३० मार्च रोजी मतमोजणी होऊन निकाल जाहीर केला जाणार आहे.गेल्या सत्तर वर्षांपासून जिल्हा बँकेच्या कारभारावर झनक कुटुंबाचे वर्चस्व राहिले आहे. सहकार क्षेत्रातील ही मोठी सत्ताकेंद्रे टिकवून ठेवण्यासाठी झनक समर्थकांकडून जोर लावला जात आहे,तर दुसरीकडे पाचरणे यांनी आक्रमक भूमिका घेतल्याने हे वर्चस्व मोडीत काढण्याचे आव्हान निर्माण झाले आहे.**

### जिल्ह्याचे लक्ष निकालाकडे


■ **यंदाच्या निवडणुकीत दोन्ही उमेदवार आपापली ताकद लावत आहेत. प्रचाराचा धुराळा उडत असून,प्रत्येक मतासाठी फोडाफोडीचे राजकारणही सुरू झाल्याची चर्चा आहे. अकोला आणि वाशिम या दोन्ही जिल्ह्यांच्या अर्थकारणात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या जिल्हा बँकेत नेमकी कोणाची सत्ता येणार,हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.मतदारांचा कौल कोणाला मिळतो आणि जिल्हा बँकेच्या सत्तेचे समीकरण कसे बदलते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. सत्ताधारी गटाचे वर्चस्व अबाधित राहते की,पाचरणे गटाचा 'विठ्ठल' निवडणुकीच्या रणांगणात विजय मिळवतो, याचे उत्तर ३० मार्चला मिळणार आहे.**

# चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रात भ्रष्टाचाराचा 'हाय व्होल्टेज' ड्रामा

### सेवानिवृत्त मुख्य अभियंत्यांच्या आशीर्वादाने कंत्राटदाराची चांदी!

**विदर्भ केसरी। चंद्रपूर:**

आशिया खंडातील महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रात (CSTPS) नियम धाब्यावर बसवून भ्रष्टाचार सुरू असल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. माजी मुख्य अभियंता राठोड यांच्या कार्यकाळात कंत्राटदारांना पायघड्या घालत, चक्क अपात्र आणि जुन्या गाड्यांना 'गेटपास' देऊन सरकारी तिजोरीवर दरोडा टाकल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) सुनील देहेगावकर यांनी केला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, मागील महिन्यात सेवानिवृत्त झालेले मुख्य अभियंता विजय राठोड यांच्या कार्यकाळात 'मे. वैष्णवी एंटरप्रायझेस' या कंपनीला ११ फेब्रुवारी २०२६ रोजी ६३ लाख ६० हजार ४७८ रुपयांचे दोन वर्षांचे कंत्राट देण्यात आले होते. हे कंत्राट कोळसा हाताळणी विभाग A) मध्ये दोन वाहने पुरवण्यासाठी होते. मात्र, या कंत्राटात कागदोपत्री दाखवलेली वाहने बाजूला ठेवून, चक्क १०-१० वर्षे जुनी आणि टॅक्सी परवाना नसलेली वाहने वापरली जात असल्याचे समोर आले आहे.

महाऔष्णिक विद्युत केंद्र हे अतिसंवेदनशील क्षेत्र (Sensitive Zone) घोषित करण्यात आले आहे. नियमानुसार येथे प्रवेश करणाऱ्या प्रत्येक वाहनाची सुरक्षा तपासणी आणि कागदपत्रांची पूर्तता होणे अनिवार्य असते. तरीही:MH-46-AE-8877 (Scorpio): ही १० वर्षे जुनी गाडी चक्क सुरक्षा विभागात कार्यरत आहे. MH-06-BU-2427 (Swift Dzire): या गाडीला टॅक्सी परवाना नसतानाही उप-मुख्य अभियंता हनिंद्र नाखले ती वापरत असल्याचे पत्रात नमूद आहे.

MH-34-BG-1215 (Bolero): या गाडीचा टॅक्स जून २०२४ मध्ये आणि P.U.C. सप्टेंबर २०२४ मध्येच संपले आहे, तरी ही ही गाडी कोळसा सॅम्पलिंग विभागात सर्रास फिरत आहे. नियमबाह्य पद्धतीने गेटपास बनवून या गाड्यांना प्रवेश देणे, हे केवळ भ्रष्टाचाराचे लक्षण नसून केंद्राच्या सुरक्षेलाही मोठा धोका निर्माण करणारे आहे

### गुन्हे दाखल करण्याची मागणी

■ **सुनील देहेगावकर यांनी मुख्य अभियंता अनिल काठोये यांना पत्र लिहून या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली आहे. "अतिसंवेदनशील क्षेत्रात अशा प्रकारे बेकायदेशीररीत्या वाहने वापरणे गंभीर आहे. जर काही घातपात झाला तर त्याला जबाबदार कोण?" असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. या प्रकरणी दोषी अधिकारी आणि मे. वैष्णवी एंटरप्रायझेसवर तातडीने गुन्हे दाखल करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. आता पाहण्यासारखे हे ठरेल की, प्रशासकीय चौकशीत या 'विद्युत भ्रष्टाचाराचे' मूळ कुठपर्यंत जाते आणि दोषींवर खरोखर कारवाई होते की प्रकरणावर पडदा टाकला जातो.**

## नांदगाव खंडेश्वरमध्ये ईद-उल-फित्र मोठ्या उत्साहात



**विदर्भ केसरी। नांदगाव खंडेश्वर**

ईद-उल-फित्रचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. गुरुवारी सकाळी ८:०० वाजता अमरावती रोडवरील ईदगाहमध्ये मौलाना सय्यद जुनैद साहब यांनी ईदची नमाज अदा केली. मौलाना सय्यद हिसामोद्दीन साहब यांनी ईदचे बयान दिले. शांतता आणि सलोख्यासाठी प्रार्थना करण्यात आली.

लहान मुलांमध्ये ईदबद्दल खूप उत्साह होता. नमाजानंतर सर्वांनी एकमेकांना मिठी मारली आणि ईद मुबारकच्या शुभेच्छा दिल्या. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी, नांदगाव खंडेश्वरचे ठाणेदार लाबंडे यांच्या नेतृत्वाखाली ईदगाहमध्ये कडक व्यवस्था करण्यात आली होती. शहराचे माजी जिल्हा परिषद सदस्य निशिकांत जाधव,नगर सेवक प्रकाश मारोटकर, नगर पंचायत उपाध्यक्ष शेख जमीर, राहुल गुल्हाणे, बांधकाम सभापती मो रियाज, मो हारुण, ए.एम.आय.एम.चे अथर खान, सोनू रॉक, जावेद पठाण, इतर अधिकारी आणि पोलिसांनी मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी समाजाचे सदस्य उपस्थित होते.

दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
सोमवार, २३ मार्च २०२६ | ४

## विदर्भ GOOD MORNING
!! मना-मनात दारा-दारात फक्त विदर्भ केसरी!!

### कौटुंबिक वादातून पतीचे टोकाचे पाऊल:
■ एकीकडे पत्नीच्या अब्रूसाठी पोलिसांत धाव घेऊन न्याय मागितला, मात्र त्यानंतर अवघ्या काही तासांतच पतीने मृत्यूला कवटाळल्याची हृदयद्रावक घटना लाखांदूर तालुक्यातील जैतपूर येथे घडली आहे. कौटुंबिक वादातून संतापलेल्या शुभम देवीदास चित्रीत (३२) या तरुणाने राहत्या घराच्या पोर्चमध्ये नायलॉनच्या दोरीने गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपविली. या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. या घटनेची पार्श्वभूमी अशी की, १५ मार्च रोजी शुभमची पत्नी गावातीलच एका भाजीपाल्याच्या नर्सरीत कामाला गेली होती. सायंकाळी ५:०० वाजेच्या सुमारास ती नर्सरीत एकटी असल्याचे पाहून स्थानिक रहिवासी मुकेश रामदास उके (३६) याने तिची छेड काढली.

महत्त्वाचे




## नऊ वर्षांच्या शाळकरी मुलीशी शेजाऱ्याचे अश्लील चाळे
**▸विदर्भ केसरी। नागपूर :**

चॉकलेटच्या बहाण्याने ९ वर्षीय मुलीसोबत ज्येष्ठाने केलेले अश्लिल चाळे, महाविद्यालयीन विद्यार्थ्याने गळफास लावून केलेली आत्महत्या आणि रेल्वेखाली एकाने संपवलेली जीवनयात्रा आणि राज्य सरकारचा अबकारी कर चोरून मध्य प्रदेशातून तस्करी केलेला लाखो रुपयांच्या विदेशी मद्याचा साठा पोलिसांनी पकडल्याच्या घटनांनी उपराजधानीचे शहर असलेले नागपूर हादरून गेले. दरम्यान एकाच दिवशी घडलेल्या दोन आत्महत्यांमुळे शहरात हळहळ व्यक्त होत आहे. त्यामुळे वाढत्या नैराश्याचा मुद्दा देखील पुन्हा एरणीवर आला आहे.

### चिमुरडीवर अत्याचाराने हादरले पारडी
गुढीपाडव्या निमित्त शाळेला सुटी असल्याने अवघ्या ९ वर्षांची शाळकरी मुलगी परिसरात मैत्रिणीसोबत खेळत होती. त्यावेळी ओळखीचा गैरफायदा घेत शेजारी राहणारा सुरा दशरथ रोडे (वय ५२) याने मुलीला चॉकलेटचे आमिष दाखवून जवळ बोलवले. ती येताच सुराने मुलीशी अश्लिच चाळे केले. हा प्रकार मुलीने आईला सांगितल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. मुलीच्या आईने थेट पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार नोंदवली. त्याची दखल घेत पोलिसांनी आरोपीविरुद्ध बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदांतर्गत गुन्हा दाखल करत सुरा रोडे याला अटक केली.

### . महाविद्यालयीन तरुणाची आत्महत्या
शाळकरी मुलीवर झालेल्या अत्याचाराची घटना ताजी असतानाच मानकापूर परिसर अभ्यास आणि करीअरच्या ताणातून नुकतीच ११ वीची परिक्षा दिलेल्या महाविद्यालयीन तरुणाने घरातच गळफास घेऊन जीवनयात्रा संपवली. सौरभ मोहन राठोड (२७, रा. विठ्ठल रुक्मिणी नगर ) असे या महाविद्यालयीन तरुणाचे नाव आहे. सौरभचे वडील मोहन हातमजुरी करून उदरनिर्वाह करतात. तर आई घरकाम करते. हे चौकोनी कुटुंब सौरभ आणि लहान भावासोबत मानकापूरातील विठ्ठल रुक्मिणी नगरात रहात होते. सौरभने नुकतीच ११वीची परीक्षा दिली होती. घरात कोणीच नसताना सौरभने आत्महत्या केली. त्याने इतका टोकाचा निर्णय का घेतला याचे कोडे निर्माण झाले आहे.

### रेल्वेखाली दिला जीव
नागपूर : कावरापेठ रेल्वे रुळावरील खांब क्रमाक १२५ जवळ रुळावर एका ४० ते ५० वर्षे वयोगटातील व्यक्तीने रेल्वेखाली उडी घेऊन आत्महत्या केली, पोलिसांना तीन तुकडे झालेल्या अवस्थेत हा मृतदेह सापडला. मृताची ओळख अद्याप पटलेली नाही. नियंत्रण कक्षाकडून मिळालेल्या माहितीवरुन यशोधरानगर पोलिसांनी घटनास्थळ गाठत मृतदेहाचा पंचनामा करत उत्तरीय तपासणीसाठी मृतदेह मेयो रुग्णालयात रवाना केला.

### तलवार, चाकू घेऊन फिरणाऱ्या दोघांना अटक
**▸विदर्भ केसरी। नागपूर :**

यशोधरानगरात विटा भट्टी नाल्याजवळ हातात तलवार घेवून धुडघूस घालणारा गुंड नरेंन्द्र उर्फ बाली चिंतामण बोकडे (२३, रा. फुकट नगर) आणि आणि डिप्टी सिग्नल येथे चाकूच्या धाकावर गोंधळ घालणारा सागर नरेंन्द्र विश्वकर्मा (३०, रा. रा. गोपाल नगर नाल्याजवळ, कळमना) या दोघांना पोलिसांनी वेळीच रोखले. ठाण्यात आणून गुन्हा दाखल केल्यानंतर अभिलेख तपासला असता दोघांवरही यापूर्वी गंभीर स्वरुपाचे गुन्हे नोंद असल्याचे पोलीसांना आढळले.

### करचोरून तस्करी केलेले लाखोंचे मद्य पकडले
**▸विदर्भ केसरी। नागपूर :**

राज्याच्या अबकारी कराची चोरी करून शेजारील मध्य प्रदेश आणि छत्तीसगडमधून कमी दराच्या विदेशी मद्याची मोठ्या प्रमाणात तस्करी करत ते महाराष्ट्रात विक्रीसाठी आणलेला लाखो रुपयांचा मद्यसाठा हुडकेश्वर पोलिसांनी पकडला. दिघोरी चौकात नाकाबंदीदरम्यान पोलिसांनी पांढऱ्या रंगाच्या ऑडी आलिशान कारची झडती घेतली असता पोलिसांना हा मद्यसाठा सापडला. महाराष्ट्राचा कर चोरून प्रविण वसंतराव कुरेवार (५३, रा. चिटणवीस नगर, नंदनवन) याने हे मद्य बेकायदेशीररित्या महाराष्ट्रात आणल्याचे पोलिसांना प्राथमिक तपासात आढळले आहे. प्रविणच्या ताब्यातून पोलिसांनी विदेशी बनावटीच्या ५८४ बाटल्या आणि १३२ बिअरच्या कॅन जप्त केल्या आहेत.

# हॉटेल, उपहारगृह व्यावसायिकांना दिलासा!
## २० टक्के अतिरिक्त गॅस पुरवठा... केंद्राच्या निर्देशानुसार निर्णय...

**विदर्भ केसरी। नाशिक**




व्यावसायिक गॅस तुटवड्यामुळे अडचणीत आलेल्या हॉटेल, ढाबे, उपहारगृह व्यावसायिकांना राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी एक आनंदाची बातमी दिली आहे. राज्यातील हॉटेल, ढाबे, उपहारगृहे तसेच औद्योगिक कॅन्टीन आणि अन्न प्रक्रिया-दुग्धव्यवसाय क्षेत्रासाठी दिलासादायक निर्णय घेण्यात आला असून केंद्र शासनाच्या निर्देशानुसार २० टक्के अतिरिक्त व्यापारी एलपीजी गॅसचा पुरवठा करण्यात येणार असल्याची माहिती मंत्री छगन भुजबळ यांनी दिली आहे. केंद्र सरकारच्या पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने २१ मार्च २०२६ रोजी दिलेल्या सूचनांनुसार, यापूर्वी राज्याला ३० टक्के वाटप मंजूर होते. आता २३ मार्चपासून पुढील आदेश येईपर्यंत आणखी २० टक्के वाटप वाढविण्यात आले असून एकूण गॅस पुरवठा पूर्व-संकट पातळीच्या ५० टक्क्यांपर्यंत पोहोचणार आहे. याअतिरिक्त २० टक्के वाटपात हॉटेल, ढाबे, उपहारगृहे, औद्योगिक कॅन्टीन, अन्न प्रक्रिया व दुग्धव्यवसाय यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. तसेच राज्य शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे चालविण्यात येणाऱ्या अनुदानित कॅन्टीन, कम्युनिटी किचन्स आणि स्थलांतरित मजुरांसाठीच्या योजनांनाही लाभ मिळणार आहे.मंत्री छगन भुजबळ यांनी सांगितले की, या निर्णयामुळे व्यापारी एलपीजीच्या तुटवड्यामुळे अडचणीत आलेल्या हॉटेल आणि उपहारगृह व्यवसायिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. मात्र, गॅस मिळविण्यासाठी संबंधित व्यावसायिकांना तेल विपणन कंपन्यांकडे नोंदणी करणे आणि पीएनजीसाठी अर्ज करणे बंधनकारक राहणार आहे. केंद्राच्या या निर्णयामुळे राज्यातील खाद्यव्यवसायाला मोठा दिलासा मिळणार असून पुरवठा साखळी अधिक सुलभ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.दरम्यान, राज्यातील केरोसिन वितरणाबाबतही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. प्रलंबित परवाने नूतनीकरण झालेले मानण्यात येणार असून, कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. तसेच



वारसांच्या नावे परवाने तात्काळ वर्ग करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ज्या गावामध्ये किरकोळ केरोसिन परवानाधारक उपलब्ध नाहीत, अशा गावांमध्ये रास्तभाव दुकानदारास किरकोळ केरोसिन परवानाधारक समजण्यात येऊन त्यास परवाना देण्यात यावा. राज्यातील किरकोळ, हॉकर्स, अर्धघाऊक व घाऊक केरोसिन परवाने मंजुरी, नुतनीकरण व वारसाच्या नावे वर्ग करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत दिनांक २० मार्च २०२६ च्या शासनपत्रान्वये सर्व जिल्हाधिकारी यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

### पीएनजीसाठी अर्ज करणे बंधनकारक
केंद्र सरकारच्या पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने २१ मार्च २०२६ रोजी दिलेल्या सूचनांनुसार, यापूर्वी राज्याला ३० टक्के वाटप मंजूर होते. आता २३ मार्चपासून पुढील आदेश येईपर्यंत आणखी २० टक्के वाटप वाढविण्यात आले असून एकूण गॅस पुरवठा पूर्व-संकट पातळीच्या ५० टक्क्यांपर्यंत पोहोचणार आहे. याअतिरिक्त २० टक्के वाटपात हॉटेल, ढाबे, उपहारगृहे, औद्योगिक कॅन्टीन, अन्न प्रक्रिया व दुग्धव्यवसाय यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. तसेच राज्य शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे चालविण्यात येणाऱ्या अनुदानित कॅन्टीन, कम्युनिटी किचन्स आणि स्थलांतरित मजुरांसाठीच्या योजनांनाही लाभ मिळणार आहे.मंत्री छगन भुजबळ यांनी सांगितले की, या निर्णयामुळे व्यापारी एलपीजीच्या तुटवड्यामुळे अडचणीत आलेल्या हॉटेल आणि उपहारगृह व्यवसायिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. मात्र, गॅस मिळविण्यासाठी संबंधित व्यावसायिकांना तेल विपणन कंपन्यांकडे नोंदणी करणे आणि पीएनजीसाठी अर्ज करणे बंधनकारक राहणार आहे. केंद्राच्या या निर्णयामुळे राज्यातील खाद्यव्यवसायाला मोठा दिलासा मिळणार असून पुरवठा साखळी अधिक सुलभ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## अकोला-वाशिम जिल्हा बँकेच्या निवडणुकीत 'हायव्होल्टेज' लढत
### ; झनक कुटुंबाच्या वर्चस्वाला डॉ पाचरणे यांचे आव्हान

**▸विदर्भ केसरी। रिसोड प्रतिनिधी- प्रदिप खंडारे**





गेल्या अनेक वर्षांपासून बिनविरोध होणाऱ्या अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीने यंदा खऱ्या अर्थाने राजकीय वळण घेतले आहे.रिसोड येथील ३०/१ अ, प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा/विकास सेवा सहकारी संस्था मतदार संघाच्या निवडणुकीत विद्यमान आमदार अमित झनक यांच्या मातोश्री शोभाताई झनक आणि कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती गजानन पाचरणे यांचे सुपुत्र डॉ.विठ्ठल पाचरणे यांच्यात थेट लढत होत असल्याने जिल्ह्याचे राजकीय वातावरण तापले आहे.गेली अनेक दशके या बँकेवर झनक कुटुंबाचे निर्विवाद वर्चस्व राहिले आहे, परंतु यंदा पहिल्यांदाच हे वर्चस्व निवडणुकीच्या मैदानात कसोटीला लागले आहे. जिल्हा बँकेच्या या मतदार संघाची निवडणूक गेल्या दहा वर्षांपासून बिनविरोध होत होती. विशेष म्हणजे, बाजार समितीचे माजी सभापती गजानन पाचरणे हे दरवेळी आपला उमेदवारी अर्ज दाखल करत,परंतु ऐनवेळी काही कारणास्तव ते अर्ज मागे घेत असत. मात्र,यंदाची निवडणूक परिस्थिती पूर्णपणे वेगळी आहे.गजानन पाचरणे यांनी यावेळी माघार न घेता आपले सुपुत्र डॉ.विठ्ठल पाचरणे यांना रिंगणात उतरवले आहे. दुसरीकडे,झनक गटाने शोभाताई झनक यांच्या माध्यमातून आपली पकड कायम ठेवण्यासाठी कंबर कसली आहे. या एका जागेच्या निवडणुकीसाठी दोन्ही बाजूंकडून सर्वस्व पणाला लावले जात असल्याने रिसोडसह संपूर्ण जिल्ह्यात ही निवडणूक चर्चेचा विषय ठरली आहे.

**■ ७४ मतदारांच्या हाती सत्तेची चावी**

या निवडणुकीसाठी एकूण ७४ मतदार आपले मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदारांची संख्या कमी असली,तरी या निवडणुकीचे राजकीय महत्त्व अनन्य साधारण आहे.२९ मार्च रोजी रिसोड येथे मतदानाची प्रक्रिया पार पडणार असून,३० मार्च रोजी मतमोजणी होऊन निकाल जाहीर केला जाणार आहे. गेल्या सत्तर वर्षांपासून जिल्हा बँकेच्या कारभारावर झनक कुटुंबाचे वर्चस्व राहिले आहे.सहकार क्षेत्रातील ही मोठी सत्ताकेंद्रे टिकवून ठेवण्यासाठी झनक समर्थकांकडून जोर लावला जात आहे,तर दुसरीकडे पाचरणे यांनी आक्रमक भूमिका घेतल्याने हे वर्चस्व मोडीत काढण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. जिल्ह्याचे लक्ष निकालाकडे यंदाच्या निवडणुकीत दोन्ही उमेदवार आपापली ताकद लावत आहेत.प्रचाराचा धुराळा उडत असून,प्रत्येक मतासाठी फोडाफोडीचे राजकारणही सुरू झाल्याची चर्चा आहे. अकोला आणि वाशिम या दोन्ही जिल्ह्यांच्या अर्थकारणात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या जिल्हा बँकेत नेमकी कोणाची सत्ता येणार,हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.मतदारांचा कौल कोणाला मिळतो आणि जिल्हा बँकेच्या सत्तेचे समीकरण कसे बदलते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. सत्ताधारी गटाचे वर्चस्व अबाधित राहते की,पाचरणे गटाचा 'विठ्ठल' निवडणुकीच्या रणांगणात विजय मिळवतो, याचे उत्तर ३० मार्चला मिळणार आहे.

## आज महादीप परीक्षा गुणवंत विद्यार्थ्यांचे विमान उडणार भुर्रर्र
**▸विदर्भ केसरी। प्रतिनिधी**



**यवतमाळ** जिल्हा परिषद शिक्षण विभागाचा बहुचर्चित महादीप उपक्रम जिल्ह्यासह राज्यातही सुपरिचित झाला आहे .शिक्षण विभागाने २०२५ -२६ या शैक्षणिक सत्रात पाचव्या वर्षीही जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची आवड निर्माण व्हावी. या हेतूने हा उपक्रम सातत्याने सुरू ठेवला आहे. ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षेची सवय लागावी.या परीक्षेतून विमानवारी अशी अनोखी ओळख या उपक्रमाची झाली असल्याने हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी पर्वणी ठरला आहे .शाळा ,केंद्र तालुका आणि जिल्हास्तर ही चाळणी परीक्षा देऊन या अंतिम परीक्षेत जिल्ह्यातील ५५ विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले. या विद्यार्थ्यांच्या विमानवारीसह व त्यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन २३ मार्च २०२६ ला सकाळी ९.०० वाजता जिल्हा परिषद सभागृह यवतमाळ येथे करण्यात आले आहे .यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांच्या हस्ते गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा , पालकांचा तथा महादीप परीक्षा आयोजनासाठी उत्कृष्ट कार्य करणारे मार्गदर्शक शिक्षक,समन्वयक , सहसमन्वयक, तालुका समन्वयक, आदींचा सत्कार करण्यात येणार आहे. व याच दिवशी त्यांच्या बसला सीईओ श्री.मंदार पत्की हिरवी झेंडी दाखवून हे सर्व विद्यार्थी विमानवारीसाठी प्रस्थान करतील. यासाठी शिक्षण विभागाने जय्यत तयारी केली आहे. या सत्कार सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी शिक्षणाधिकारी प्रकाश मिश्रा, यांच्या पुढाकारात जिल्हा समन्वयक तथा विस्तार अधिकारी प्रणिता गाढवे , यांच्यासह सहसमन्वयक, शिक्षण विभागाचे अधिकारी,कर्मचारी , तालुका समन्वयक आदि कार्य करीत आहे. अशी माहिती राजहंस मेंढे यांनी दिली आहे.

## ■ निधन वार्ता



### सिंधुताई चौधरी
वैद्यकीय क्षेत्रात नावाजलेले शास्त्री नगर येथे राहणारे डॉ. अशोक चौधरी यांच्या आईचे सिंधुताई आनंदराव चौधरी यांचे आज पहाटे निधन झाले . त्या ९२ वर्षाच्या होत्या . त्यांचे मागे डॉ अशोक व रवींद्र ही मुले व डॉ संजीवनी बिहाडे या विवाहित कन्या व मोठा आप्त परिवार आहे . आज त्यांच्यावर येथील मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार पार पडला

### आराधनाताई विडुळकर



यवतमाळ (प्रतिनिधी) डॉ. दिनेश विडुळकर यांच्या पत्नी आराधनाताई विडुळकर (45 वर्षे) यांचे आज रविवारी (22 मार्च) सायंकाळी अल्पशः आजाराने दुःखद निधन झाले. पशुचिकित्सा व्यवसायी संघटनेचे राज्य पदाधिकारी आणि महाराष्ट्र शिंपी संघटनेचे पदाधिकारी डॉ. दिनेश सुधाकरराव विडुळकर यांच्या त्या पत्नी होत. त्यांचे पश्चात सासूबाई, पती डॉ. दिनेश, आदित्य व कौस्तुभ ही दोन मुले आणि मोठा आप्त परिवार आहे.

## राममय वातावरणात सामूहिक रामरक्षा पठण संपन्न
**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**



श्री रामनाम उपासना मंडळ द्वारा संचालित श्रीराम मंदिर तिवारी चौक अवधूत वाडी यवतमाळ येथे सलग सातव्या वर्षी सामूहिक रामरक्षा पठण कार्यक्रमाचे आयोजन रविवार दिनांक 22 मार्च रोजी करण्यात आले होते.सकाळच्या मंत्रमुग्ध वातावरणात,राम भक्तांच्या ओसंडून वाहणाऱ्या गर्दीमध्ये सामूहिक रामरक्षा पठण संपन्न झाले.याप्रसंगी महिलांची लक्षणीय उपस्थिती होती. प्रारंभी मंडळाचे अध्यक्ष डॉ सुनील लुले,उपाध्यक्ष नरेंद्र देशपांडे,ज्येष्ठ उद्योजक मुकुंदराव औदार्य आणि सौ मुक्ता वैद्य यांच्या हस्ते प्रभू रामचंद्रांचे पूजन करण्यात आले. यानंतर श्रीराम जय राम जय जय राम या जपमाळाने सामूहिक रामरक्षेला प्रारंभ झाला. बालगोपालांच्या साक्षीने ज्येष्ठांच्या उपस्थितीने पाच वेळा श्री रामरक्षा आवर्तन एक वेळा मारुती स्तोत्र पठण करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने व्यासपीठावर वर्षा दामले,जकाते काका,मोरेश्वर पुंड,सचिन परसोडकर यांच्या समवेत स्वरा राम साकळे,वेदश्री अमित शारंगपाणी,आद्या सुश्रुत लूले, शलाका आशिष गांजीवाले,पावी निखिलेश जोशी,श्रीपाद गौरव बापट,दत्तराज तुषार महाजन,देवांश मूलमुले,श्रेयस प्रशांत दामले यांचा समावेश होता. यानंतर मान्यवरांच्या हस्ते महाआरती करण्यात आली यामध्ये जनता नागरी पतसंस्थेचे अध्यक्ष अनिल दंडे,यवतमाळ अर्बन कॉपरेटिव बँकेचे संचालक परिमल देशपांडे,तेजस्विनी सेवा समितीच्या अध्यक्ष श्रीमती सुलभा गौड,विवेकानंद छात्रावासाच्या संचालक मधुरा वेळुकर,निखिल रानडे,संजय माथी यांच्या हस्ते महाआरती संपन्न झाली. या सामूहिक रामरक्षा पठण कार्यक्रमात विविध संस्थांनी आपला सहभाग नोंदवला यामध्ये प्रामुख्याने युवा ब्राह्मण संघ, इस्कॉन,समर्थ ब्राह्मण मंडळ,अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ,सखी ब्राह्मण महिला मंडळ,गायत्री परिवार,श्री स्वामी समर्थ केंद्र यांच्यासोबतच विविध शालेय विद्यार्थ्यांचा सुद्धा आवर्जून सहभाग होता. या संपूर्ण कार्यक्रमाकरिता श्री रामनाम उपासना मंडळाच्या समस्त विश्वस्तांनी विविध शाळांमध्ये भेटी देऊन,विविध संस्थांच्या भेटी घेऊन हा कार्यक्रम परिश्रमपूर्वक संपन्न केला.

# कोलाम समाजाच्या ऐतिहासिक 'पायदळ लॉंग मार्च'चे मोहदा येथे जंगी स्वागत
## विघ्नहर्ता गणेश मंडळातर्फे मोर्चेकऱ्यांच्या चोख व्यवस्था ; पुंडलिक टेकाम यांचा पुढाकार

**▸विदर्भ केसरी। पांढरकवडा**

मोहदा - अतिमागास कोलाम समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी पांढरकवडा येथून निघालेल्या ऐतिहासिक 'पायदळ लॉंग मार्च'चे मोहदा नगरीत मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात स्वागत करण्यात आले. २० मार्च २०२६ रोजी निघालेला हा मोर्चा २१ मार्च रोजी दुपारी मोहदा येथे दाखल झाला. यावेळी संपूर्ण गाव कोलाम समाजबांधवांच्या हक्काच्या घोषणांनी दुमदुमून गेले होते. मोहदा येथे आलेल्या मोर्चेकऱ्यांची गैरसोय होऊ नये, यासाठी स्थानिक विघ्नहर्ता गणेश मंडळ, झोटिंगधरा यांनी पुढाकार घेतला. मंडळाच्या वतीने मोर्चेकऱ्यांसाठी थांबण्याची, नास्ता आणि चहा ची अत्यंत शिस्तबद्ध व्यवस्था करण्यात आली होती. या संपूर्ण नियोजनाचे नेतृत्व पुंडलिक टेकाम यांनी केले. रणरणत्या उन्हात मैलोन्मैल चालत आलेल्या समाजबांधवांना या व्यवस्थेमुळे मोठा आधार मिळाला. मोर्चेकऱ्यांचे स्वागत करताना मोहदाचे सरपंच अक्षय मेश्राम म्हणाले की, "कोलाम समाज हा निसर्गाशी नातं सांगणारा आणि अत्यंत प्रामाणिक समाज आहे. मात्र, आजही हा समाज मूलभूत सुविधांपासून वंचित आहे. त्यांच्या न्याय्य हक्कासाठी काढण्यात आलेल्या या लॉंग मार्चला आमचा पूर्ण पाठिंबा आहे. मोहदा ग्रामपंचायत आणि ग्रामस्थ या आंदोलनात त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत. सरकारने या समाजाच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करू नये."

आयोजक पुंडलिक टेकाम यांचे मनोगत:यावेळी पुंडलिक टेकाम यांनी आपली भूमिका मांडताना सांगितले की, "आपल्या हक्कासाठी घराबाहेर पडलेल्या समाजबांधवांची सेवा करणे हे आमचे कर्तव्य आहे. विघ्नहर्ता गणेश मंडळाच्या माध्यमातून आम्ही केवळ सोय केली नाही, तर या लढ्यात आम्हीही त्यांच्यासोबत आहोत हा संदेश दिला आहे. कोलाम समाजाच्या व्यथा सरकारपर्यंत पोहोचाव्यात आणि त्यांना न्याय मिळावा, हीच आमची भावना आहे."

आंदोलनाचा पुढील टप्पा: हा मोर्चा प्रदेशाध्यक्षा इंदिरा बोंदरे, युवा नेते अतुल आत्राम आणि राहुल चिच्चघाटे यांच्या नेतृत्वाखाली यवतमाळच्या दिशेने कूच करत आहे. मोहदा येथील सभेत बोलताना नेत्यांनी 'शामदादा कोलाम स्वतंत्र अभ्यास आयोग' तातडीने स्थापन करण्याची आणि सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार देण्याची मागणी लावून धरली. हा मोर्चा आता यवतमाळ येथे पालकमंत्री संजय राठोड यांच्या निवासस्थानावर धडकणार असून, निर्णय न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे.यावेळी कुंदन कुडमथे,मोरेश्वर गायकवाड रुंझा बिट जमदार दरांडे, कमलेश काकडे, पोलीस पाटील पियुष गबराणी आणि मोठ्या संख्येने कोलाम समाजबांधव, महिला व युवक उपस्थित होते



# आमदार निधी की भ्रष्टाचाराची 'गंगा'?




## नालवाड्यात 25 लाखांच्या निधीचा 'बोजवारा!

**। अमोल कंटाळे ।**
**विदर्भ केसरी**

शासनाकडून जनहितासाठी आणि ग्रामीण भागाच्या विकासासाठी आमदार निधीतून लाखो रुपयांची तरतूद केली जाते. मात्र, दर्यापूर तालुक्यात या निधीचा विनियोग जनहितासाठी होतोय की अधिकारी आणि ठेकेदारांच्या 'खिसे भरती'साठी, असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे. तालुक्यातील नालवाडा पुनर्वसन रस्ता कामात झालेला उघड भ्रष्टाचार हे केवळ हिमनगाचे टोक असून, अशा कित्येक कामांचा तालुक्यात 'बोजवारा' उडाला आहे. या साऱ्या प्रकरणाकडे लोकप्रतिनिधींचे 'लक्ष' आहे की ठेकेदारांवर त्यांची विशेष 'मेहेरबानी' सुरू आहे, असा प्रश्न आता सर्वसामान्य जनता विचारत आहे. नालवाडा बस स्टँड ते पुनर्वसन या रस्ता बांधकामासाठी २५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. जिल्हा परिषद विभागामार्फत हे काम पूर्ण झाल्याचे दाखवण्यात आले. मात्र, प्रत्यक्ष कामाची पाहणी केली असता, तांत्रिक नियमांना पूर्णपणे हरताळ फासल्याचे दिसून येते. डांबरीकरण केल्यानंतर रस्त्याच्या दोन्ही बाजूंना खडी आणि मातीच्या 'साईड पट्ट्या' भरणे अनिवार्य असते, जेणेकरून अपघात टाळता येतील. मात्र, येथे साईड पट्ट्यांचा पत्ताच नाही! रस्त्याचा दर्जा इतका निकृष्ट आहे की, २५ लाखांपैकी केवळ १० ते १२ लाख रुपये खर्च करून उर्वरित रकमेवर ठेकेदार आणि संबंधित अधिकाऱ्यांनी डल्ला मारल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे.




**दर्यापूर तालुक्यात भ्रष्टाचाराची 'साखळी'?**

नालवाडा हे केवळ एक प्रातिनिधिक उदाहरण आहे. दर्यापूर तालुक्यात आमदार निधीतून होणारी कित्येक कामे सध्या संशयाच्या भोवऱ्यात आहेत. कागदोपत्री सर्व कामे 'ओक्के' दाखवून बिले काढण्याची घाई प्रशासकीय यंत्रणेला झाली आहे. मात्र, प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी निकृष्ट साहित्य आणि तांत्रिक चुकांचा डोंगर उभा आहे. अनेक ठिकाणी रस्ते बांधून महिना होत नाही, तोच ते उखडत आहेत. तर दुसरी कडे डिजिटल शाळा असो किंवा विविध विकास कामे असो मग प्रश्न पडतो की, जिल्हा परिषदेचे अभियंता आणि संबंधित प्रशासकीय विभाग नक्की काय देखरेख करत आहेत? की हे सर्व 'अर्थपूर्ण' दबावाखाली सुरू आहे?

**आमदार साहेबांचा निधी, मग साहेब गप्प का?**

आमदार साहेबांच्या निधीतून कामे होत असताना, त्या कामांच्या गुणवत्तेची खात्री करण्याची जबाबदारी स्वतः लोकप्रतिनिधींची असते. आपल्याच मतदारसंघात जनतेच्या पैशाची अशी लूट होत असताना आमदार साहेब गप्प का? ठेकेदारांनी मांडलेला हा भ्रष्टाचाराचा उघड खेळ त्यांना दिसत नाही का? की या भ्रष्ट साखळीत कोणाचे 'हित' गुंतले आहे, अशी दबक्या आवाजात चर्चा आता तालुक्यात सुरू झाली आहे.

**'विदर्भ केसरी'ची विशेष पोलखोल मोहिमेची तयारी!**

नालवाडा येथील रस्ता कामाची वरिष्ठ स्तरावरून चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. 'दैनिक विदर्भ केसरी' आता दर्यापूर तालुक्यातील अशा प्रत्येक कामाची झाडाझडती घेणार असून, जिथे जिथे नियमांची पायमल्ली झाली असेल, तिथे तिथे प्रशासनाला आणि लोकप्रतिनिधींना जाब विचारला जाईल

# प्रधानमंत्री आवास योजनेचे रखडलेले अनुदान तात्काळ द्या!

**विदर्भ केसरी । प्रल्हाद मेश्राम**



देसाईगंज : तालुक्यात गोरगरीबांना पक्के घरे देण्याच्या नावाखाली खैरात वाटून प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणात घरकुल मंजूर करण्यात आले. मंजूर घरकुल धारकांनी आपले राहते घर उधळून नवीन घरबांधणी सुरु केली. मात्र आधिच दुष्काळात तेरावा महिना भोगत असलेल्या घरकुल लाभार्थ्यांचे अनुदान रखडले असल्याने संबंधितांवर उघड्यावर संसार थाटण्याची वेळ आली आहे. ही गंभीर बाब लक्षात घेता शासनाने तात्काळ प्रधानमंत्री आवास योजनेचे रखडलेले अनुदान तात्काळ द्यावे, अन्यथा या विरोधात तीव्र आंदोलन करण्याचा अल्टिमेटम ओबीसी काँग्रेस कमिटीचे प्रदेश सचिव मनोज ढोरे यांनी शासनाला दिला आहे. ढोरे यांनी म्हटले आहे की एकट्या देसाईगंज तालुक्यात प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत १ हजार २७९ घरकुल मंजूर करण्यात आले असुन हे सर्व लाभार्थी शासनाच्या निकषानुसार गरजु गरीब असुन अतिशय हलाखीचे जीवन जगणारे आहेत. हातावर आणुन पानावर खाण्याची अवस्था असतांना शासकीय स्तरावरुन देण्यात येत असलेल्या अनुदानात अल्पशा मिळकतीची रक्कम टाकून घरकुल पुर्ण होण्याचे स्वप्न पाहात आहेत. मात्र शासकीय स्तरावरुन देय अनुदान रखडल्याने व हाती होती नव्हती रक्कमही घरकुल बांधकामात गुंतवल्याने खायचे काय आणि राहायचे कुठे असा गंभीर प्रश्न लाभार्थीसमोर उभा ठाकला आहे.

एकट्या देसाईगंज तालुक्यात घरकुलांचा आकडा मोठा असुन सर्वात मोठी ग्रामीण ग्रामपंचायत असलेल्या कुरुड या एकट्या गावात तब्बल ४० घरकुल लाभार्थ्यांचे अनुदान मागील कित्येक महिन्यांपासून रखडले आहे. घरकुल बांधकामासाठी लागत असलेली लागत व शासकीय स्तरावरुन देण्यात येत असलेले देय अनुदान पाहु जाता घरकुल बांधकाम पुर्ण होणे अशक्य असल्याचे पाहु जाता, शासकीय स्तरावरुन मंजूर घरकुलाचे बांधकाम करून प्रसंगी उसनवार रक्कम घेऊन बांधकाम सुरु केले होते. मात्र प्राप्त अनुदानाची रक्कम रखडल्याने बाप भिक मागू देईना व आई जेवू घालेना, अशी स्थिती घरकुल लाभार्थ्यांची झाली असून, चारी बाजुंनी कोंडी होत आहे. एकट्या देसाईगंज तालुक्यातील १ हजार २७९ घरकुल लाभार्थ्यांच्या अनुदानानाची तब्बल १ करोड ६५ लाखापेक्षा जास्त रक्कम रखडली असल्याने बांधकाम अपुर्णावस्थेत असुन अनेकांना उघड्यावर संसार थाटण्याची वेळ आली आहे. ही गंभीर बाब लक्षात घेता शासनाने तात्काळ रखडलेले अनुदान उपलब्ध करून द्यावे, अन्यथा विरोधात तीव्र आंदोलन करण्याचा ईशारा ढोरे यांनी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकातुन शासनाला दिला आहे. याबाबत शासकीय स्तरावरुन काय कारवाई केली जाते, याकडे येथील घरकुल बांधकामधारकांचे लक्ष लागून आहे.

# जिल्ह्यातील रेतीघाटांवर "रात्रीस खेळ चाले"!



**विदर्भ केसरी । गडचिरोली**

जिल्ह्यातील ज्या- ज्या ठिकाणी रेती घाट सुरू आहेत किंवा ज्या ज्या गावांना नदी लागून आहे त्या त्या ठिकाणाच्या व संबंधित येणाऱ्या तलाठी साजा क्रमांकाच्या जागेवरती जाऊन येथील रेतीघाटांवर मोठ्या प्रमाणात अवैध रेती उत्खनन सुरू असून, यामध्ये महसूल विभागातील काही कर्मचाऱ्यांचा सहभाग असल्याचा गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सदर सुटलेल्या घाटांवर दिवसा शुकशुकाट असतो परंतु "रात्री स खेळ चाले रेतीचा" मात्र बारा 12 वाजल्याच्या नंतर पोकलेनच्या साह्याने रेती काढून रेती तस्करी मोठ्या प्रमाणात केली जाते. त्यामुळे सदर शासनाचा महसूल रेती तस्करांच्या घशात जातो व त्यातील काही पोट हिस्सा संबंधित महसूल विभागाचे किंवा तलाठी यांना सुद्धा दिला जातो. त्यामुळे शासनाचे नेमलेले अधिकारी मात्र त्यांचा फोटो घेऊन मोकळे होतात आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सर्व काही सुरळीत असल्याचे रिपोर्टिंग करून भासवतात. सदर रेती तस्करीची भनक आर.आय. ला, तलाठी यांना सर्वांना माहीत असतानाही त्यांच्याकडे ढुंकूनही पाहत नाही आणि शासनाला सांगतात की सर्व काही बरोबर आहे. त्याच्यामुळे शासनाने संबंधित तहसीलदार, आरआय, तलाठी यांची मोका चौकशी करा किंवा दुसऱ्या दिवशी जाऊन (SIT)चौकशी करा भ्रष्टाचार आपोआप बाहेर येणार. याबाबत प्रशासनाकडे अनेक गावकऱ्यांनी, राजकारण्यांनी, किंवा सुज्ञ व्यक्तींनी तक्रार दाखल केली असूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

# नागपुरात गंगाधरराव फडणवीस मेमोरियल डायग्नोस्टिक सेंटरचे लोकार्पण

## माजी खासदार डॉ. अशोकजी नेते यांचीही विशेष उपस्थिती..

**विदर्भ केसरी । नागपुर**

श्री सिद्धि विनायक सेवा फाऊंडेशन, नागपूर यांच्या वतीने गंगाधरराव फडणवीस मेमोरियल डायग्नोस्टिक सेंटरचे भव्य लोकार्पण सोहळा श्रीराम नगर, पावनभूमी मैदान, सोमलवाडा, नागपूर येथे उत्साहात पार पडला. या उपक्रमामागे केंद्रीय मंत्री नितिन गडकरी यांच्या संकल्पनेचा व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष प्रयत्नांचा महत्त्वपूर्ण वाटा असून, आमदार संदीप जोशी यांच्या विचारातून साकारलेले हे सेवा कार्य 'सेवा हीच सर्वोच्च धर्म' या भावनेतून उभे राहिले आहे. या लोकार्पण सोहळ्याला सरसंघचालक प. पु. डॉ. मोहनजी भागवत, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, केंद्रीय मंत्री नितिनजी गडकरी, महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे, कौशल्य मंत्री मंगल प्रभातजी लोधा, राज्यमंत्री पंकजजी भोयर, राज्यमंत्री अँड. बीआशिषजी जैस्वाल, नागपूरच्या महापौर निताताई ठाकरे, राज्यसभा खासदार मायाताई इवनाते, तसेच माजी खासदार तथा राष्ट्रीय महामंत्री भाजप अनुसूचित जनजाती मोर्चा डॉ. अशोकजी नेते, माजी आमदार सुधाकर कोहळे यांसह अनेक मान्यवर व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात "इतनी शक्ति हमें देना दाता" या प्रेरणादायी गीताने झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात सांगितले की, गोरगरीब व सर्वसामान्य जनतेसाठी हे डायग्नोस्टिक सेंटर समर्पित असून, यामुळे नागरिकांना सवलतीच्या दरात उत्तम आरोग्य सेवा उपलब्ध होईल. त्यांनी या उपक्रमाबद्दल फाऊंडेशनचे अभिनंदन करत, समाजसेवेचा हा आदर्श उपक्रम असल्याचे प्रतिपादन केले. केंद्रीय मंत्री नितिन गडकरी यांनी गंगाधरराव फडणवीस यांच्या व्यक्तिमत्त्वाचा गौरव करत सांगितले की, त्यांच्या नावाने उभारलेले हे सेंटर म्हणजे त्यांच्या सेवाभावाचे समर्पण असुन त्यांनी आरोग्य सेवेला सर्वोच्च प्राधान्य देण्याची गरज अधोरेखित करत सांगितले की, कॅन्सरसारख्या गंभीर आजारांवरील उपचार अत्यंत महागडे आहेत, त्यामुळे अनेकांना उपचार घेता येत नाहीत.

अशा परिस्थितीत स्वस्त दरात डायग्नोस्टिक सेवा उपलब्ध होणे ही मोठी समाजसेवा आहे. सरसंघचालक मोहनजी भागवत यांनी आपल्या मार्गदर्शनात गंगाधरराव फडणवीस यांच्या कार्याचा उल्लेख करत सांगितले की, सार्वजनिक व राजकीय कार्यकर्ता कसा असावा याचे ते उत्तम उदाहरण होते. त्यांनी सेवा, शिक्षण, स्वास्थ आणि रोजगार या चार स्तंभांवर समाज उभा राहतो असे सांगत, सेवा ही उपकार नसून आत्मशुद्धीचा मार्ग आहे, असे प्रेरणादायी विचार मांडले. या सेंटरच्या माध्यमातून सर्वसामान्य, गोरगरीब नागरिकांना सवलतीच्या दरात विविध वैद्यकीय तपासण्या उपलब्ध होणार असून, नागपूर शहरात आरोग्य सेवेला एक नवे बळ मिळणार आहे. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. हा उपक्रम समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्य सेवा पोहोचवण्याच्या दिशेने उचललेले एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरत आहे.

# बाम्हणी रेतीघाटांवर मोठा भ्रष्टाचार? प्रशासनाचे मौन संशयास्पद

## आजाद समाज पार्टीचा गंभीर आरोप; संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी

**विदर्भ केसरी । गडचिरोली**

जिल्ह्यातील बाम्हणी येथील रेतीघाटांवर मोठ्या प्रमाणात अवैध रेती उत्खनन सुरू असून, यामध्ये महसूल विभागातील काही कर्मचाऱ्यांचा सहभाग असल्याचा गंभीर आरोप आजाद समाज पार्टीने केला आहे. पक्षाचे जिल्हाध्यक्ष राज बन्सोड यांनी याबाबत प्रशासनाकडे लेखी तक्रार दाखल केली असूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मौजा बाम्हणी येथील यमाजी निकोडे यांच्या सर्वे क्रमांक ५२३ मधून शासनाने ५३०० ब्रास रेती उत्खननाची मर्यादित परवानगी दिली होती. मात्र, या परवान्याचा गैरवापर करून मोठ्या प्रमाणावर अवैध रेती उत्खनन व वाहतूक सुरू असल्याचे समोर आले आहे. तक्रारीनुसार, परवानगी केवळ सर्वे क्र. ५२४ साठी असताना शेजारील सर्वे क्र. ५२५ मधूनही बेकायदेशीर उत्खनन सुरू आहे. याबाबत संबंधित शेतमालक सुभाष नरुले यांनीही तहसीलदारांकडे तक्रार दिली आहे. तसेच सीमांकन नियमांचे उल्लंघन करून ट्रॅक्टरच्या सहाय्याने सीमाबाहेरील रेती आत ढकलून उत्खनन केल्याचे आरोप करण्यात आले आहेत. विशेष म्हणजे,



संबंधित ठिकाणी सीमांकनासाठी लावण्यात आलेले पोल वारंवार हलवले जात असल्याचे निरीक्षण करण्यात आले असून याचे पुरावेही उपलब्ध असल्याचा दावा करण्यात आला आहे. याशिवाय, सीसीटीव्ही फुटेज व स्थानिक पुरावे तपासल्यास संपूर्ण अवैध कारभार उघड होऊ शकतो, असेही तक्रारीत नमूद आहे. या सर्व प्रकारांबाबत एक-दोन नव्हे तर तीन वेळा तक्रारी करूनही प्रशासनाने अद्याप कोणतीही कायदेशीर कारवाई न केल्याने संशय अधिक गडद झाला आहे. प्रशासनाच्या सहकार्याशिवाय इतक्या मोठ्या प्रमाणावर रेती तस्करी होऊ शकत नाही, असा आरोप राज बन्सोड यांनी केला आहे. आजाद समाज पार्टीच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे - संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करण्यात यावी., अवैध उत्खननात सहभागी सर्वांवर महाराष्ट्र जमीन महसूल संहिता व खनिज नियमांनुसार कठोर कारवाई करावी., सर्वे क्र. ५२४ चे तात्काळ पुनः सीमांकन करून पंचनामा करावा., उत्खननासाठी वापरलेली यंत्रसामग्री व वाहने जप्त करावीत., सीसीटीव्ही फुटेजसह सर्व पुरावे जप्त करून दोषींवर गुन्हे दाखल करावेत. दरम्यान, पुढील सहा दिवसांत प्रशासनाने कारवाई न केल्यास आजाद समाज पार्टीच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. तसेच प्रशासनाचा निष्क्रिय व संशयास्पद कारभार जनतेसमोर उघड केला जाईल, असेही पक्षाने स्पष्ट केले आहे.

# दारू विक्री केल्यास २० हजारांचा दंड; ब्राह्मणपल्ली ग्रामस्थांचा पुढाकार

**विदर्भ केसरी । गडचिरोली**

भामरागड तालुक्यातील ब्राह्मणपल्ली येथील ग्रामस्थांनी गावातील वाढत्या व्यसनाधीनतेवर आळा घालण्यासाठी एक अत्यंत कठोर आणि महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. गावात दारू विक्री करणाऱ्यांवर आता थेट २०,००० रुपयांची दंडात्मक कारवाई करण्याचा ठराव ग्रामसभेत एकमताने मंजूर करण्यात आला आहे. गावाला व्यसनमुक्त करण्यासाठी मुक्तीपथच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्थांनी घेतलेल्या या पवित्र्यामुळे निश्चितच हे गाव व्यसनमुक्तीकडे वाटचाल करणार आहे. या सभेत केवळ दंडच नव्हे, तर गावात लपून-छपून दारू विक्री करणाऱ्यांवर नजर ठेवण्यासाठी ग्रामस्थांनी अनोखी शक्कल लढवली आहे.

जो कोणी अशा अवैध विक्रेत्याची माहिती देईल किंवा त्याला पकडून देईल, त्या व्यक्तीला ५,००० रुपयांचे रोख बक्षीस देऊन गौरविण्यात येणार आहे. ग्राम संघटनेने केवळ दंडावर न थांबता नियमावली जाहीर केली आहे. दारू पिऊन पत्नीला मारहाण करणाऱ्यास किंवा गावात धिंगाणा घालणाऱ्यास १,००० रुपये दंड आकारला जाईल. दारू विक्रेत्यांचे वडील किंवा जबाबदार नातेवाईक यामध्ये दोषी आढळल्यास त्यांना २,००० रुपये दंड भरावा लागेल. दारू विक्रीचा व्यवसाय करणाऱ्यांना 'रोजगार हमी योजने'च्या कामावर घेण्यास मज्जाव करण्यात आला आहे.

» Selected

## पदोन्नतीसाठी पैसे घेतल्याच्या तक्रारीमुळे जि.प. कर्मचारी संघटनेचे राज्य अध्यक्ष अडचणीत

गडचिरोली :- कर्मचाऱ्यांच्या हक्कासाठी लढणारे जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष उमेशचंद्र चिलबुले यांनी पदोन्नतीसाठी एक लाख रुपयांची रक्कम घेतल्याची तक्रार सेवानिवृत्त ग्रामविकास अधिकाऱ्याने केली आहे. तर हे प्रकरण जुने असून तक्रारीत तथ्य नसल्याचा दावा अध्यक्षांकडून करण्यात आला आहे. यासंदर्भात सेवा निवृत्त ग्रामविकास अधिकारी दोमोधर नानया उप्परवार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार त्यांनी त्यांची विस्तार अधिकारी या पदावर पदोन्नती व्हावी, यासाठी चिलबुले यांना एक लाख रूपये दिले होते. मात्र त्यांनी पदोन्नतीचे काम केले नाही. पैशांची मागणी केल्यानंतर पैसेही परत केले नाहीत. तगादा लावल्यानंतर २० हजार रुपयांची रक्कम फोन पे व्दारा परत केले असून अद्यापही ८० हजार रुपये बाकी असल्याचे त्यांनी तक्रारीत म्हटले आहे. याबाबत गडचिरोलीचे जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे सीइओ आणि नागपूरचे विभागीय महसूल आयुक्त यांच्याकडे पत्र पाठवण्यात आली होती. त्यानुसार त्यांनी चिलबुले यांना बाजू मांडण्यासाठी देखील बोलावले होते. आता याप्रकरणी त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. तक्रारींचा केवळ बनाव ? चिलबुलेनी बदल्यांबाबत केलेल्या तक्रारी या पारदर्शकतेसाठी होत्या की प्रशासनावर दबाव टाकून वसुली करण्यासाठी, अशी चर्चा जिल्हा परिषदेच्या कॅन्टीनपासून ते थेट मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या दालनापर्यंत रंगली आहे. या तक्रारीमुळे कर्मचारी महासंघाच्या प्रतिमेला तडा गेल्याचे मत सभासद व्यक्त करत आहेत.

“ बदनामीची नोटिसही दिली.. जुना विषय घेऊन माझ्या बदनामीसाठी बनावट तक्रार केली आहे. याबाबत मी बदनामीचा नोटीसही दिली आहे. संबंधित तक्रारदारास संघटनेच्या वतीने मदत म्हणून २० हजार रुपयांची रक्कम अदा करण्यात आलेली आहे. -उमेशचंद्र चिलबुले, अध्यक्ष,
-जिल्हा परिषद कर्मचारी महासंघ.

## दोन दुचाक्या एकमेकींना धडकल्या अन् खाली कोसळलेल्या दुचाकीस्वाराच्या अंगावरून गेला ट्रक..!



गडचिरोली :- जिल्ह्याच्या चामोर्शी तालुक्यातून एक भीषण अपघाताची घटना समोर आली आहे. काल शनिवारी सायंकाळच्या सुमारास घडलेल्या विचित्र अपघातात चंद्रपूर जिल्ह्याच्या मूल तालुक्यातील हळदी येथील एका ४२ वर्षीय इसमाचा दुर्दैवी मृत्यू झाला. भारत शेंडे असे अपघात मृत पावलेल्या इसमाचे नाव असून सदरचा अपघात चामोर्शी तालुक्याच्या आष्टी-आलापल्ली मार्गावरील मार्कंडा फाट्यानजिक घडला. विशेष म्हणजे, पहिल्यांदा दोन दुचाक्या एकमेकींना धडकल्या. यात भारत शेंडे हे खाली कोसळले. तितक्यातच पाठीमागून येणारा ट्रक अंगावरून गेल्याने भारत शेंडे यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. प्रकरणी शेंडे यांच्या दुचाकीला धडक देणारा दुचाकीस्वार आरोपी अक्षय तारक शहा रा. सुभाषग्राम, ता. चामोर्शी, जि. गडचिरोली व ट्रक चालक रविशंकर बुधलाल नागलेकर, रा.शिवनगर, कांद्री कन्हान, ता. पारशिवनी, जि. नागपूर या दोघांविरोधात मृतकाची पत्नी प्रिती भारत शेंडे वय ३४ वर्षे, रा.हळदी, ता. मूल, जि. चंद्रपूर यांनी आज, रविवार २२ मार्च रोजी आष्टी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून त्यांच्याविरोधात भारतीय न्याय संहिता कलम १०६ (१), २८१,१२५ (ब) व मोटार वाहन कायद्याच्या कलम १८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा पुढील तपास आष्टी पोलीस ठाण्याचे पीएसआय मदन मस्के करीत आहेत.

# महाराष्ट्रसह २२ राज्यांत ‘SIR’ मोहीम !

## एप्रिलपासून घरोघरी मतदार पडताळणी—मतदार यादी होणार अधिक अचूक...

विदर्भ केसरी । दिल्ली

देशातील निवडणूक प्रक्रियेची विश्वासार्हता अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने Election Commission of India ने मोठा निर्णय घेत ‘SIR’ (Special Intensive Revision) ही विशेष मोहीम हाती घेतली आहे. एप्रिल २०२६ पासून महाराष्ट्रासह २२ राज्यांत ही मोहीम सुरू होणार असून, यामध्ये प्रत्यक्ष घरोघरी जाऊन मतदारांची माहिती तपासण्यावर भर दिला जाणार आहे. त्यामुळे येणाऱ्या निवडणुकांसाठी तयार होणारी मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक आणि त्रुटीमुक्त करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. सध्या अनेक ठिकाणी मतदार यादीत त्रुटी असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. मृत व्यक्तींची नावे कायम राहणे, स्थलांतरित नागरिकांची नोंद अद्याप न हटवणे, एका व्यक्तीची दोन-तीन ठिकाणी नोंद असणे किंवा चुकीची माहिती नोंदवली जाणे अशा समस्या मोठ्या प्रमाणात आढळतात. या पार्श्वभूमीवर SIR मोहीम ही एक प्रकारे ‘संपूर्ण स्वच्छता अभियान’ ठरणार आहे. प्रशासनाने यासाठी सखोल नियोजन केले असून, प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचून त्यांची माहिती प्रत्यक्ष पडताळण्याचा निर्णय घेतला आहे. या मोहिमेत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी, म्हणजेच BLO यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहणार आहे.

BLO अधिकारी आपल्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक घराला भेट देतील. तेथील कुटुंबातील मतदारांची माहिती तपासतील, नोंदीतील नाव, पत्ता, वय, ओळख तपशील यांची खात्री करून घेतील आणि आवश्यक असल्यास बदलही नोंदवतील. काही ठिकाणी नव्याने पात्र झालेल्या तरुण मतदारांची नोंदणी केली जाईल, तर चुकीच्या किंवा डुप्लिकेट नोंदी वगळल्या जातील. यामुळे मतदार यादीची गुणवत्ता मोठ्या प्रमाणात सुधारण्याची अपेक्षा आहे. या प्रक्रियेत नागरिकांनीही सक्रिय सहभाग घेणे अत्यावश्यक आहे. BLO अधिकारी घरी आल्यानंतर योग्य माहिती देणे, आवश्यक कागदपत्रे दाखवणे आणि चुकीची माहिती असल्यास ती तात्काळ दुरुस्त करून घेणे ही प्रत्येक मतदाराची जबाबदारी आहे. अन्यथा, पडताळणी दरम्यान माहिती अपूर्ण किंवा चुकीची आढळल्यास संबंधित नाव यादीतून वगळले जाण्याची शक्यता




नाकारता येत नाही. त्यामुळे “आपले नाव आपल्याच लक्षात ठेवणे” ही आता प्रत्येक नागरिकाची प्राथमिक जबाबदारी बनली आहे. पडताळणीसाठी आधार कार्ड, मतदार ओळखपत्र, रेशन कार्ड यांसारखी कागदपत्रे ग्राह्य धरली जाणार आहेत. काही प्रकरणांमध्ये इतर ओळखपत्रांचीही मागणी होऊ शकते. त्यामुळे नागरिकांनी आपली कागदपत्रे आधीपासून तयार ठेवणे आवश्यक आहे. विशेषतः ग्रामीण भागात आणि दुर्गम क्षेत्रात राहणाऱ्या नागरिकांसाठी ही मोहीम अधिक महत्त्वाची ठरणार आहे, कारण अनेक वेळा या भागातील मतदार नोंदी अद्ययावत नसतात. या उपक्रमामुळे केवळ मतदार यादीच अचूक होणार नाही, तर निवडणूक प्रक्रियेवरील विश्वासही अधिक दृढ होणार आहे. बनावट मतदान, डुप्लिकेट नोंदी आणि चुकीच्या माहितीमुळे निर्माण होणारे प्रश्न मोठ्या प्रमाणात कमी होतील. परिणामी, निवडणुका अधिक पारदर्शक आणि निष्पक्ष पद्धतीने पार पडण्यास मदत होईल. एकूणच, एप्रिलपासून सुरू होणारी SIR मोहीम ही निवडणूक व्यवस्थेतील एक महत्त्वाची सुधारणा मानली जात आहे. ही मोहीम यशस्वी होण्यासाठी प्रशासनासोबतच नागरिकांचाही तितकाच सहभाग गरजेचा आहे. मतदारांनी आपली माहिती वेळेवर तपासून अद्ययावत ठेवली, तरच या मोहिमेचा खरा उद्देश साध्य होईल आणि प्रत्येक नागरिकाचा मतदानाचा हक्क सुरक्षित राहील. घरोघरी पडताळणी कशी होणार? या मोहिमेत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत. BLO अधिकारी थेट तुमच्या घरी येतील घरातील मतदारांची माहिती पडताळतील नोंदीतीलतपशील(नाव,पत्ता,वयइ.)तपासतील आवश्यक असल्यास नवीन माहिती अपडेट करतील यामुळे “ऑनलाइन फॉर्म भरला की झाले” असा विषय नाही—सरकार आता प्रत्यक्ष दारात येऊन चेक करणार आहे. कोणती कागदपत्रे लागतील? पडताळणीसाठी काही मूलभूत कागदपत्रे तयार ठेवणे आवश्यक आहे आधार कार्ड मतदार ओळखपत्र (Voter ID) रेशन कार्ड (गरजेनुसार इतर ओळखपत्रही मागवले जाऊ शकतात) मतदारांसाठी महत्वाची सूचना__ ही मोहीम फक्त सरकारी काम नाही—तुमची जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे. तुमचे नाव मतदार यादीत आहे का ते तपासा चुकीची माहिती असल्यास लगेच दुरुस्ती करा BLO अधिकारी आल्यावर सहकार्य करा कागदपत्रे वेळेवर दाखवा जर तुम्ही निष्काळजी राहिलात, तर नाव वगळले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. का आहे ही मोहीम इतकी महत्त्वाची? निवडणुका म्हणजे लोकशाहीचा कणा. पण जर मतदार यादीच चुकीची असेल, तर संपूर्ण प्रक्रिया प्रश्नचिन्हात येते. SIR मोहिमेमुळे: बनावट मतदानावर नियंत्रण येईल, खरी मतदारसंख्या स्पष्ट होईल. निवडणूक प्रक्रिया अधिक पारदर्शक बनेल..

## ग्रामपंचायत जवेली बुज येथे वृक्ष लागवड व श्रमदान उपक्रम

विदर्भ केसरी । एटापल्ली

दिनांक 22/03/2026 रोजी रविवारला मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत एटापल्ली तालुक्यातील ग्रामपंचायत जवेली बुज येथे ग्रामस्थांच्या श्रमदानातून वृक्ष लागवड कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमास ग्रामपंचायत सरपंच कुमारी अलिशा दामा गोटामी, उपसरपंच दामजी हिचामी व ग्रामपंचायत अधिकारी प्रदीप बेलखेडे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. यावेळी श्रमदानातून एकूण 80 पोम (पाम) झाडे तसेच 100 फळझाडे जसे की आंबा, चिकू, फणस, पेरू, लिंबू, संत्री इत्यादींची लागवड करून सुंदर फळबाग तयार करण्यात आली. या प्रसंगी मौजा जवेली बुज येथील नवयुवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहकार्य केले. त्यामध्ये श्री. नंदू मट्टामी,



मुराजी पोटावी (गाव पाटील), बुधु पोटावी, लंकेश पोटावी, संदीप पोटावी, चंदू हिचामी, अमित पोटावी, चकरू पोटावी, मंगू हिचामी, गणू नैताम, बिजू हिचामी, शामराव हिचामी, कृष्णा मंडळ इत्यादींचा सहभाग होता. सर्व ग्रामस्थांनी श्रमदानात सक्रिय सहभाग नोंदवून उपक्रम यशस्वी केला. याबद्दल ग्रामपंचायत सरपंच कुमारी अलिशा ताई गोटामी यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

## ३.७० लाखांच्या दुचाकींसह दोन अट्टल चोरट्यांच्या आवळल्या मुसक्या : देसाईगंज पोलिसांची कारवाई

विदर्भ केसरी । गडचिरोली

देसाईगंज शहर व परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून दुचाकी चोरट्यांनी धुमाकूळ घातला होता. असा प्रकार सर्रास घडत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे सावट पसरले होते. मात्र, देसाईगंज पोलिसांनी अत्यंत चाणाक्षपणे तपासचक्र फिरवून दोन अट्टल चोरट्यांच्या मुसक्या आवळल्या असून, त्यांच्याकडून ३ लाख ७० हजार रुपये किमतीच्या एकूण ६ दुचाकी हस्तगत केल्या आहेत. या कारवाईमुळे दुचाकी चोरट्यांच्या टोळीचा पर्दाफाश झाला असून परिसरात खळबळ उडाली आहे. अहेमद सलिमखान पठाण (वय २१ वर्ष, रा. कमलानगर, देसाईगंज) व तुषार रतन लिल्हारे (वय १८ वर्ष, रा. चिखली, ता. कुरखेडा) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. प्राप्त माहितीनुसार, १ मार्च रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास देसाईगंज येथील शेतकरी राजरतन मेश्राम हे आपल्या मुलासह रब्बी धान लागवडीसाठी तुकुम येथील शेतशिवारात गेले होते. त्यांनी आपली एमएच ४९ बीएल ८६९१ क्रमांकाची स्कूटी रस्त्याच्या बाजूला उभी केली आणि अवघ्या २०० मीटर अंतरावर शेतात कामासाठी गेले. मात्र, अवघ्या १५ मिनिटांत चोरट्यांनी संधी साधून सदर स्कूटी लंपास केली. मेश्राम यांनी तत्काळ ही माहिती पोलिसांना भ्रमणध्वनीवरून दिली. त्यानंतर ४ मार्च रोजी अधिकृत तक्रार दाखल करण्यात आली. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक अजय जगताप यांनी तपासाची चक्रे फिरवत सहाय्यक पोलीस निरीक्षक मनिष गोडबोले यांच्याकडे तपास सोपवला. गोडबोले यांनी आपल्या विश्वसनीय सूत्रांकडून माहिती मिळवून संशयास्पद हालचाली करणाऱ्या अहेमद पठाण आणि तुषार लिल्हारे यांना ताब्यात घेतले. १८ मार्च रोजी त्यांना भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२), ३(५) अंतर्गत अटक करण्यात आली. न्यायालयात हजर करून पोलीस कोठडी मिळवल्यानंतर केलेल्या सखोल चौकशीत आरोपींनी मेश्राम यांच्या स्कूटीसह इतर ५ दुचाकी चोरल्याची कबुली दिली. पोलिसांनी या कारवाईत काळ्या रंगाची अक्टिव्हा (६० हजार), हिरो एचएफ डिलक्स (५० हजार), बजाज प्लॅटिना (४० हजार), होंडा शाईन (७० हजार), हिरो स्प्लेंडर (७० हजार) आणि दुसरी होंडा ॲक्टिव्हा (८० हजार) असा एकूण ३ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही यशस्वी कामगिरी पोलीस निरीक्षक अजय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि मनिष गोडबोले,डेरकर, हवालदार राजू उराडे, शैलेश तोरपकवार यांनी पार पाडली. याकामी सपोनि संदिप आगरकर, नितेश कडव, जिवन हेडाऊ, अंकुश चौधरी व पोलीस कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले आवश्यक कागदपत्रांसह पोलीस ठाण्यात संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाभियान उत्साहात संपन्न

## केंद्र व राज्य सरकारच्या योजना तळागाळापर्यंत पोहोचवा : भाजप जिल्हाध्यक्ष प्रा. रमेश बारसागडे

विदर्भ केसरी । भामरागड

भारतीय जनता पार्टीच्या वतीने आयोजित 'दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाभियान २०२६' चा जिल्हास्तरीय कार्यक्रम आज २२ मार्च रोजी पीडब्ल्यूडी रेस्ट हाऊस हॉल येथे मोठ्या उत्साहात पार पडला. याप्रवेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना भाजप जिल्हाध्यक्ष प्रा. रमेशजी बारसागडे यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या जनहितकारी योजना प्रत्येक शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रा. रमेशजी बारसागडे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी



मंचावर ज्येष्ठ नेते बाबुरावजी कोहडे, जिल्हा महामंत्री प्रकाश गेडाम, जिल्हा सचिव दिलीपजी चलाख, जिल्हा उपाध्यक्ष सुनील विश्वास, सोशल मीडिया प्रमुख चेतनजी कोलते, तालुका अध्यक्ष अर्जुन आलाम, तालुका महामंत्री तपेश हलदार, नगराध्यक्ष रामबाई महाका यांच्यासह पक्षाचे ज्येष्ठ पदाधिकारी उपस्थित होते. कार्यकर्त्यांना मिळाले महत्त्वपूर्ण मार्गदर्शन: प्रशिक्षण शिबिराच्या विविध सत्रांमध्ये मान्यवरांनी कार्यकर्त्यांना पक्षसंघटन आणि कार्यपद्धतीबाबत सखोल मार्गदर्शन केले. ज्येष्ठ नेते बाबुरावजी कोहडे यांनी 'कार्यविस्ताराची आमची दृष्टी' या विषयावर भाष्य करताना पक्ष वाढीसाठी कार्यकर्त्यांनी कशा प्रकारे सक्रिय राहावे, याचे सूत्र मांडले. जिल्हाध्यक्ष प्रा. रमेशजी बारसागडे यांनी 'आपली कार्यपद्धती' या विषयावर कार्यकर्त्यांना शिस्त आणि लोकसंपर्काचे महत्त्व पटवून दिले. तसेच, दिलीपजी चलाख यांनी 'बूथ व्यवस्थापन' या विषयावर तांत्रिक माहिती दिली, तर प्रकाशजी गेडाम यांनी 'SRI' (Social Responsibility Initiative) आणि शासनाच्या महत्त्वाच्या धोरणांवर मोलाचे मार्गदर्शन केले. योजनांच्या अंमलबजावणीवर कार्यकर्त्यांचे 'वॉचडॉग' म्हणून लक्ष: या महाभियानाचा मुख्य उद्देश स्पष्ट करताना सर्वच वक्त्यांनी कार्यकर्त्यांना एक महत्त्वाचा कानमंत्र दिला. केंद्र व राज्य सरकारच्या योजनांचे लाभ गरजूंपर्यंत पोहोचत आहेत की नाही, यावर शक्ती केंद्र प्रमुख आणि बूथ प्रमुखांनी कटाक्षाने लक्ष द्यावे. जर कुठल्याही योजनेत तांत्रिक अडचण येत असेल किंवा लाभार्थ्यांना लाभ मिळत नसेल, तर तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांना माहिती देऊन प्रश्न मार्गी लावण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले. या प्रशिक्षण शिबिराला जिल्ह्यातील सर्व शक्ती केंद्र प्रमुख, बूथ प्रमुख आणि ज्येष्ठ कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यकर्त्यांमध्ये या प्रशिक्षणामुळे नवा उत्साह संचारला असून, आगामी काळात घराघरात भाजपचे विचार पोहोचवण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

# गडचिरोली पोलीस भरतीची लेखी परीक्षा शांततेत

## ७१७पदांसाठी ९९.५४ टक्के उमेदवारांची हजेरी...!

विदर्भ केसरी । विनोद सेलोटे

गडचिरोली जिल्हा पोलीस दलाअंतर्गत ७१७ पोलीस शिपाई पदांच्या भरतीसाठीची लेखी परीक्षा रविवारी २२ अत्यंत शिस्तप्रिय आणि पारदर्शक वातावरणात पार पडली. जिल्ह्याच्या इतिहासातील ही एक महत्त्वाची भरती प्रक्रिया असून, लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या ७,००३ उमेदवारांपैकी ६,९७१ उमेदवारांनी प्रत्यक्ष परीक्षा दिली. उपस्थितीचे हे प्रमाण तब्बल ९९.५४ टक्के इतके राहिले असून, संपूर्ण भरती प्रक्रियेत आधुनिक तंत्रज्ञानाचा आणि चोख पोलीस बंदोबस्ताचा वापर करण्यात आला होता. या भरती प्रक्रियेची मैदानी चाचणी १४ फेब्रुवारी ते ७ मार्च २०२६ या कालावधीत पार पडली होती. त्यामध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे पात्र ठरलेल्या उमेदवारांसाठी आज शहरातील १४ केंद्रांवर दोन सत्रांत परीक्षा घेण्यात आली. सकाळी १०:०० ते ११:३० या वेळेत सामान्य अध्ययन विषयाचा पहिला पेपर, तर दुपारी १:०० ते २:३० या वेळेत गोंडी व माडिया या स्थानिक भाषांवरील दुसरा पेपर पार पडला. सर्व १४ केंद्रांवर सुरक्षेच्या दृष्टीने कडेकोट बंदोबस्त तैनात होता. यासाठी १६६ पोलीस अधिकारी, ६९३ पोलीस अंमलदार आणि १३२ शिक्षक व मंत्रालयीन कर्मचारी अशा एकूण १,००० मनुष्यबळाची नियुक्ती करण्यात आली होती. विशेष म्हणजे, या परीक्षेदरम्यान कोणताही गैरप्रकार घडू नये, यासाठी गडचिरोली पोलीस दलाने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला. उमेदवारांना प्रवेश



देताना मेटल डिटेक्टरने तपासणी आणि बायोमॅट्रिक पद्धतीने नोंदणीचे पुनर्रिक्षण करण्यात आले. काही संवेदनशील केंद्रांवर सुरक्षा व्यवस्थेचा भाग म्हणून सिग्नल जॅमर कारचा देखील वापर करण्यात आला होता. उमेदवारांच्या सुलभतेसाठी प्रत्येक परीक्षा केंद्राचे गुगल मॅप लोकेशन आणि बैठक व्यवस्था सोशल मीडियावरून आधीच प्रसारित करण्यात आली होती. तसेच, दोन पेपरच्या मधल्या वेळेत उमेदवारांसाठी नाश्त्याचीही सोय करण्यात आली होती. आज पार पडलेल्या दोन्ही पेपरची उत्तरतालिका (Answer Key) दुपारी ३:१५ वाजता गडचिरोली पोलीस दलाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. उमेदवारांना या उत्तरतालिकेबाबत काही आक्षेप असल्यास त्यांनी पुढील २४ तासांच्या आत ते नोंदवावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. ही संपूर्ण प्रक्रिया पोलीस अधीक्षक नीलोत्पल, अपर पोलीस अधीक्षक (अभियान) एम. रमेश, अपर पोलीस अधीक्षक (अहेरी) कार्तिक मधीरा आणि अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) गोकुल राज जी. यांच्यासह सर्व उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे राबविण्यात आली.

## "थ्रो" बाल क्रीडा स्पर्धेत श्रीराम विद्यालययातील विद्यार्थिनी प्रथम

विदर्भ केसरी । कुरखेडा

आदिवासी ग्रामीण विकास शिक्षण संस्था कुरखेडा द्वारा संचालित श्रीराम विद्यालय तथा उच्च माध्यमिक विद्यालय कुरखेडा येथील १९ वर्षीय वयोगटातील विद्यार्थिनी संघाने स्वामी विवेकानंद स्कूल गडचिरोली या संघावर जिल्हास्तरीय थ्रो बाल स्पर्धेत मात करून प्रथम क्रमांक मिळवित घवघवीत यश संपादन करून विभागीय स्तरावर झेप घेतली आहे.

कुरखेडा सारख्या आदिवासी बहुल भागातील विद्यार्थ्यांनी क्रीडा स्पर्धेत उत्तम खेळ खेळून विभागीय स्तरावर झेप घेतल्याने या गुणवंत क्रीडा खेळाडूचे सर्व स्तरावरून अभिनंदन होत आहे. विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणा सोबत मैदानी क्रीडा खेळा



संदर्भात माहिती देवून त्यांच्या कडून सराव करून घेणारे क्रिडा प्रेमी मार्गदर्शक प्राचार्य ,नागेश्वर दोषहर फाये व क्रीडा शिक्षक विलास मेश्राम यांच्या मार्गदर्शना खाली विद्यार्थिनींनी थ्रोबाल स्पर्धेत उत्तम खेळ खेळून विभागीय स्तरावर झेप घेतल्याने सर्वत्र कौतुक होत आहे. यावेळी शाळा समिती अध्यक्ष वामनराव फाये, संस्था सचिव दोषहरराव फाये, संस्था सचिव तथा प्राचार्य नागेश्वर फाये,माजी सिनेट सदस्य तथा शाळा समिती सदस्य चांगदेव फाये, व श्रीराम विद्यालय तथा उच्च माध्यमिक विद्यालय कुरखेडा येथील प्राध्यापक प्राध्यापिका व शिक्षकेतर कर्मचारी व संस्थेच्या वतीने जिल्हास्तरीय "थ्रो "बाल संघातील खेळाडूंचा अभिनंदन करण्यात आले आहे.